नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २४५ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




# महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




बुधवार, दि. १९ ऑगस्ट २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## भाईंदर- विरार मेट्रो प्रकल्पास मान्यता

### पुणे रिंगरोडच्या पूर्व विस्तारीकरणासही मान्यता



मुंबई : (स. गांवकरी)

मुंबई महानगरप्रदेशातील वाहतुकीला चालना देण्यासाठी मिरा भाईंदर ते वसई विरार मेट्रो १३ या सुमारे १७ हजार कोटी रुपये खर्चाच्या मेट्रो प्रकल्पास मंगळवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यावेळी पुणे शहरातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी महत्त्वाच्या ठरणाऱ्या पुणे रिंगरोडच्या सोरतापवाडी ते वरवे – शिवरे मार्गासही मान्यता देण्यात आली. फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीस उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा उत्पादन शुल्क मंत्री सुनेत्रा अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, उद्योग मंत्री उदय सामंत, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, एमएमआरडीचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी आदि उपस्थित होते. ठाणे आणि पालघर जिल्ह्यांतून जाणाऱ्या मेट्रो १३ -मिरा भाईंदर ते वसई-विरार मार्गाची अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहे. या प्रकल्पाचा एकूण खर्च १७ हजार ७२४कोटी अपेक्षित आहे. या मार्गाची एकूण लांबी २५.०३ किलोमीटर असून, त्यापैकी २१.७८ किलोमीटर मार्ग उन्नत, तर ३.२५ किलोमीटर मार्ग भूमिगत असेल. या मार्गावर एकूण १६ स्थानके प्रस्तावित आहेत. त्यामध्ये १३ उन्नत आणि तीन भूमिगत स्थानकांचा समावेश आहे. या प्रकल्पात मेट्रो मार्गासह ४.९२ किलोमीटर लांबीच्या वसई खाडीवरील पांजू बेटाला जोडणारा सहा पदरी (३ ३) रस्ता व मेट्रो असलेल्या एकत्रित पुलाचे नियोजन करण्यात आले आहे. चिखल डोंगरी येथे मेट्रो डेपो प्रस्तावित आहे. हा मार्ग मीरा रोड, वसई, नालासोपारा, नायगाव आणि विरार परिसरांना जोडणार आहे. मिरा भाईंदर ते वसई विरार मेट्रो १३ मार्ग नायगाव, नालासोपारा आणि विरार उपनगरी रेल्वे स्थानकाशी जोडणार जाणार असून मेट्रो मार्ग क्रमांक ९ सोबत नेताजी सुभाषचंद्र बोस स्टेडियम येथे जोडणी प्रस्तावित आहे. सर्व स्थानकांवर बस सेवा उपलब्ध करून देण्याचेही नियोजन आहे. प्रकल्पासाठी एकूण २४.८४ हेक्टर भूसंपादन अपेक्षित आहे. मान्यतेनंतर पाच वर्षांत प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

मिरा भाईंदर ते वसई विरार या मेट्रो मार्ग क्रमांक १३ या मार्गासाठी येत्या सहा महिन्यात भूसंपादन व पोहोच मार्ग तयार करण्याचे आदेश मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले. २०३१ मध्ये या मार्गावर दररोज सुमारे ४.४९ लाख प्रवासी प्रवास करतील, असा अंदाज आहे. या प्रकल्पामुळे रस्ते प्रवासाच्या तुलनेत प्रवासाचा वेळ ५० टक्क्यांनी कमी होणे, खासगी वाहनांचा वापर व मुख्य राष्ट्रीय महामार्गावरील वाहनांची घनता कमी होणे आणि कार्बन उत्सर्जनात घट होणार आहेत. औद्योगिक आणि लॉजिस्टिक केंद्रांसह वसई-विरार, मिरा-भाईंदर आणि मुंबई उपनगरांची जोडणीही या मार्गामुळे अधिक सक्षम होणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

#### पुणे रिंग रोड पूर्व विस्तारासाठी १० हजार कोटी

पुणे शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी प्रस्तावित पुणे रिंग रोडच्या पूर्व विस्तारीकरण प्रकल्पाच्या १० हजार५०२ कोटी रुपयांच्या सुधारित प्रकल्प खर्चासही या बैठकीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली. महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळामार्फत या मार्गाचे काम करण्यात येणार आहे.

## सिंगापूर, अरब एमिरातपेक्षा महाराष्ट्राची अर्थव्यवस्था मजबूत : मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई : (स. गांवकरी)



पुढील दोन वर्षांत अर्थव्यवस्थेच्या आकारमानात महाराष्ट्र राज्य सिंगापूर आणि संयुक्त अरब एमिरातला मागे टाकेल, असा ठाम विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी व्यक्त केला. भारत आणि अमेरिकेतील आर्थिक, तांत्रिक आणि धोरणात्मक भागीदारीच्या पुढील टप्प्यात महाराष्ट्र केंद्रस्थानी राहणार आहे, समृद्ध भारताच्या निर्मितीसाठी महाराष्ट्र हे गुंतवणूकदारांचे पहिल्या पसंतीचे ठिकाण (डेस्टिनेशन) ठरेल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. कृत्रिम बुद्धिमत्ता, विदा केंद्र, जागतिक सक्षमता केंद्र आणि आधुनिक पायाभूत सुविधांच्या माध्यमातून महाराष्ट्रात भविष्यातील अर्थव्यवस्थेसाठी सक्षम परिसंस्था उभारली जात असल्याचे त्यांनी सांगितले. इंडो-अमेरिकन चेंबर ऑफ कॉमर्सच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय परिषद २०२६ मध्ये फडणवीस बोलत होते. भारत आणि अमेरिकेतील गुंतवणूक, संशोधन, उत्पादन आणि विकासातील सहकार्य वाढविण्यासाठी ही परिषद महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. अमेरिकेतील गुंतवणूकदारांनी आपल्या कल्पना, संशोधन आणि तंत्रज्ञानासह महाराष्ट्रात यावे. राज्य सरकार त्यांना बाजारपेठ, पायाभूत सुविधा आणि कौशल्ययुक्त मनुष्यबळ उपलब्ध करून देईल, असे आवाहन फडणवीस यांनी केले. भारत-अमेरिका भागीदारी ही २१व्या शतकातील अत्यंत महत्त्वाची भागीदारी आहे. तिच्या पुढील टप्प्यात धोरणात्मक आणि आर्थिक सहकार्य वाढणार आहे. या दशकात भारत-अमेरिका संबंध अधिक दृढ होत असताना महाराष्ट्र या भागीदारीच्या केंद्रस्थानी असेल. राज्याची अर्थव्यवस्था सध्या सुमारे ६६० अब्ज डॉलरची आहे. मागील सात वर्षांपासून राज्य १०.२ टक्के दराने विकास करीत आहे. राज्यातील सुमारे ६५ टक्के लोकसंख्या २७ वर्षांपर्यंतच्या वयोगटातील असल्याने महाराष्ट्राकडे मोठे तरुण आणि कुशल मनुष्यबळ आहे. उत्पादनापासून मनोरंजन क्षेत्रापर्यंत विविध क्षेत्रांचा अर्थव्यवस्थेतील सहभाग वाढत असून, ही विविधता महाराष्ट्राची मोठी ताकद असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानामुळे भारत-अमेरिका सहकार्याला नवे स्वरूप मिळत आहे. जागतिक सक्षमता केंद्र, विदा केंद्र आणि जागतिक पुरवठा साखळी मजबूत करण्यासाठी दोन्ही देशांना महाराष्ट्राच्या माध्यमातून मोठ्या संधी उपलब्ध होऊ शकतात, असे फडणवीस म्हणाले. आरोग्य क्षेत्रात भारत हे 'स्केल इंजिन' तर अमेरिका 'इनोव्हेशन इंजिन'आहे.

## थोडक्यात...



### पोलीस ठाण्यांसाठी नवीन निकष

मुंबई (स. गांवकरी) : राज्यातील वाढती लोकसंख्या, शहरीकरण, औद्योगिक आणि पर्यटन क्षेत्राचा विस्तार, वाहनांची वाढती संख्या, सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने नवीन पोलीस ठाण्यांच्या निर्मितीसाठी सुधारित मार्गदर्शक तत्त्वे आणि मनुष्यबळाचे नवे निकष निश्चित केले आहेत. नवीन पोलीस ठाणे सुरू करण्यासाठी प्रस्तावित क्षेत्रातील मागील तीन वर्षांतील गुन्ह्यांची संख्या हा अनिवार्य निकष राहणार आहे. किमान सात ते आठ निकष पूर्ण होणे आवश्यक करण्यात आले आहे. गृह विभागाने याबाबतचा शासन निर्णय जारी केला आहे.

### आज वादळी पावसाचा प्रभाव

मुंबई (स. गांवकरी) : राज्यात मागील काही दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतली आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची नोंद होत असली तरीही उर्वरित राज्यात पावसाचा जोर ओसरला आहे. दरम्यान, राज्यातील काही भागांवर आज वादळी पावसाचा प्रभाव राहील, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. तसेच बहुतांश भागात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. ऑगस्टच्या पंधरवड्यात राज्यात दिलासादायक पावसाची नोंद झालेली नाही. त्यामुळे अनेक भागात असणारी पावसाची तूट कायम आहे. पावसाचे प्रमाण असमान असल्याने काही भागात ३० ते ४० टक्के पावसाची तूट निर्माण झाली असून त्यामुळे नागिरकांच्या समस्यांमध्ये वाढ झाली आहे. दरम्यान, ऑगस्टमध्ये सरासरीहून कमी पावसाची शक्यता यापूर्वीच हवामान विभागाने वर्तवली आहे. आतापर्यत ऑगस्ट महिन्यात राज्यात नोंदल्या गेलेल्या पावसानुसार कोकण प्रदेशातही पावसाची तूट आहे, तर मध्य महाराष्ट्रातील काही भागात सरासरीच्या आसपास पाऊस नोंदला गेला आहे.

### सेलिब्रिटींना १० लाखांचा दंड

मुंबई (स. गांवकरी) : 'विमल इलायची'च्या नावाखाली होणाऱ्या सरोगेट (अप्रत्यक्ष) जाहिरातींप्रकरणी अन्न व औषध प्रशासनाने बॉलिवूडचे दिग्गज अभिनेते शाहरुख खान, अजय देवगण आणि टायगर श्रॉफ यांना कारणे दाखवा नोटीस बजावल्याने सिनेसृष्टीत मोठी खळबळ उडाली. या प्रकरणात सेलिब्रिटींना १० लाखांचा दंड होऊ शकतो असं म्हणत कारवाईला उशीर झाला तरीही कारवाई होणारच असं FDA चे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी म्हटलं आहे. "नोटीस बजावण्यासाठी खूप उशीर झाला आहे असं म्हणता येणार नाही. कारण आपण आधीही नोटीस देऊ शकलो असतो. हा कायदा २०११ मध्ये आला. जाहिरातीच्या बाबतीतली नियमावली २०१८ मध्ये आणि अंमलबजावणी २०१९ मध्ये सुरु झाली. त्यामुळे नोटीस बजावण्यासाठी थोडा उशीर झाला असला तरीही कारवाई होणारच. नोटीसमध्ये हे पण म्हटलं आहे की १० लाखांचा दंड सेलिब्रिटींवर लागेल. कारण सदर पदार्थ हा बंदी असलेला आहे. जी नियमावली आहे त्यामुळे आम्ही कारवाई करु. सेक्शन ५९ च्या अंतर्गतही कारवाई केली जाईल." असंही तुकाराम मुंढे यांनी म्हटलं आहे.

## 'एआय' मुळे ऊर्जेचे महासंकट येणार! डॉ. प्रमोद काळे यांचा इशारा

पुणे : (स. गांवकरी)

'कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) ही केवळ माहिती साठवणारी यंत्रणा नसून मानवी मेंदूच्या धर्तीवर विचार करून नवनवीन गोष्टी घडवणारी अफाट क्रांती आहे. मात्र, त्याच्या अतिवापरामुळे येत्या काळात जगभरात ऊर्जेचे मोठे संकट उभे राहणार आहे,' असा इशारा भारतीय अवकाश संशोधन संस्थेचे (इस्रो) माजी संचालक ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रमोद काळे यांनी मंगळवारी एका कार्यक्रमात दिला. डॉ. दीपक शिकारपूर लिखित आणि अमलताश बुक्स प्रकाशित 'एआय युगाचा वेध' या पुस्तकाचे प्रकाशन काळे यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. 'आयसर'चे अध्यक्ष प्रा. डॉ. अरविंद नातू, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष ॲड. अशोक पलांडे, डीइएसचे कुलगुरू डॉ. राजेश इंगळे, पुस्तकाच्या सहलेखिका सुप्रिया बडवे आदी या वेळी उपस्थित होते.




'डेटा सेंटर्स साठी मोठ्या प्रमाणात ऊर्जा खर्च होत असून, त्यातून निर्माण होणाऱ्या ९७ टक्के उष्णतेचे व्यवस्थापन करता येत नाही,' असे काळे यांनी नमूद केले. तंत्रज्ञान कंपन्यांची अणुभट्ट्यांकडे होणारी वाटचाल आणि इलॉन मस्क यांच्या अंतराळातील डेटा सेंटरची संकल्पनेची व्यवहार्यता आदी मुद्द्यांवर डॉ. काळे यांनी विस्तृत विवेचन केले.

## अहिल्यानगर जिल्हा बँक निवडणुकीसाठी प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध

### अंतिम यादी १५ सप्टेंबरला;३६४७ मतदार, ३६६ ठराव अपात्र; २३३ संस्थांचे ठराव नाहीत

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी निवडणुक निर्णय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक संभाजी निकम आज, बुधवारी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली. त्यावर ३१ ऑगस्टपर्यंत हरकती व सुचना दाखल करण्याची मुदत देण्यात आली आहे. अंतिम मतदार यादी १५ सप्टेंबरला प्रसिद्ध होणार असून त्यानंतर बँकेच्या २१ संचालकांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होईल. दरम्यान, प्रारूप मतदार यादीत बँकेचे ३ हजार ६४७ सभासद मतदार आहेत. त्यात ३६६ संस्थांचे ठराव अपात्र ठरले आहेत तर २३३ संस्थांनी ठराव सादर केलेले नाहीत. जिल्हा बँकेच्या संचालक मंडळाची मुदत २० फेब्रुवारीला संपुष्टात आली आहे. मात्र मे महिन्यात बँकेवर प्रशासक मंडळ नियुक्त करण्यात आले होते. त्यानंतर जुन महिन्यात विविध कार्यकारी सेवा सोसायट्या, कृषी




पणन संस्था व शेतमाल प्रक्रिया संस्था (शेतीपुरक मतदारसंघ) व बिगर शेती संस्था मतदारसंघ अशा संस्थाचे मतदार यादी तयार करण्यासाठी १६ जुन ते १६ जुलै कालावधीत ठराव मागविण्यात आले होते. त्यानुसार निवडणूक अधिकाऱ्यांकडे विविध कार्यकारी सेवा सोसायटी संस्थांचे १ हजार ३६७, बिगर शेती मतदारसंघातून १ हजार ५९५ तर शेती पुरक मतदारसंघातून १ हजार ५१ असे ४ हजार १३ संस्थांचे मतदार ठराव प्राप्त झाले होते. त्यापैकी ३६६ ठराव अपात्र करण्यात आले आहे. त्यात विविध कार्यकारी सेवा सोसायटी संस्थांचे ७, बिगर शेती मतदारसंघाचे १२४ तर शेती पुरक मतदारसंघाचे २३५ ठराव विविध कारणांनी अपात्र ठरवले गेले आहेत. २३३ संस्थांनी ठराव दिले नाहीत. त्यात विविध कार्यकारी सेवा सोसायटी संस्थांचे २७, बिगर शेती मतदारसंघाचे १५६ तर शेती पुरक मतदारसंघाचे ५० संस्थांचा समावेश आहे. त्यामुळे बँकेच्या निवडणुकीसाठी आता अवघे ३ हजार ६४७ मतदार निश्चित झाले आहेत.

#### तालुकानिहाय संख्या

अहिल्यानगर-सोसायटी मतदारसंघ- १०९, बिगर शेती २५३, शेतीपूरक मतदारसंघ ३३. संगमनेर- सोसायटी- २३५, बिगर शेती २७९, शेतीपूरक ३१८. कोपरगाव-सोसायटी १०९, बिगर शेती २४०, शेतीपूरक १९४. राहाता-सोसायटी ७१, बिगर शेती ११५, शेतीपूरक १००. श्रीरामपूर-सोसायटी- ६९, बिगर शेती ७१, शेतीपूरक ११. नेवासा-सोसायटी १३१, बिगर शेती ९१, शेतीपूरक ३३. राहुरी- सोसायटी १०७, बिगर शेती ११७, शेतीपूरक ४२. शेवगाव- सोसायटी ६९, बिगर शेती २३, शेतीपूरक ३२. पाथर्डी- सोसायटी ८४, बिगर शेती ३३, शेतीपूरक १६. जामखेड-सोसायटी ४७, बिगर शेती ५४, शेतीपूरक १८. कर्जत-सोसायटी ७५, बिगर शेती ६८, शेतीपूरक ६५. श्रीगोंदा- सोसायटी २७१, बिगर शेती २०४, शेतीपूरक ५७. पारनेर -सोसायटी १०४, बिगर शेती ८६, शेतीपूरक ४२. अकोले- सोसायटी ८६, बिगर शेती ७१, शेतीपूरक ९२. एकूण ठराव प्राप्त- सोसायटी १ हजार ३६७, बिगर शेती १ हजार ५९५, शेतीपूरक १ हजार ५१.

## तुकाराम मुंढेंचा मोर्चा आता शाळांच्या दिशेने

### शैक्षणिक संस्थांमधील खाणावळींबाबत दिला मोठा इशारा; "पुढील ८ ते १० दिवसांत..."

मुंबई : (स. गांवकरी)

अन्न व औषध प्रशासन विभागाच्यावतीने मागील काही दिवसांपासून राज्यभरात भेसळखोरांच्या विरोधात धडक कारवाई करण्यात येत आहे. तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाची सूत्रे होती घेतल्यापासून भेसळयुक्त खाद्यपदार्थांविरोधात कारवायांचा धडाका लावला आहे.

राज्यभरात अनेक ठिकाणी भेसळयुक्त पनीर, भेसळयुक्त दूध, रेस्टॉरंट्स, हॉटेलवरील निकृष्ट दर्जाचं जेवण अशा अनेक कारवाया करण्यात आल्या आहेत. तुकाराम मुंढे यांच्या या धडाकेबाज कामामुळे त्यांची मोठी चर्चा सुरू आहे. यानंतर आता तुकाराम मुंढे यांनी आपला मोर्चा शाळा आणि महाविद्यालयाच्या दिशेने वळवल्याचं पाहायला मिळत आहे.

राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांमधील खाणावळी किंवा कॅन्टीनमध्ये अन्नपदार्थ सुरक्षेच्या नियमांचं पालन होत आहे की नाही? याची तपासणी करण्याची मोहीम एफडीए लवकरच हाती घेणार असल्याचे संकेत तुकाराम मुंढे यांनी दिले आहेत. 'शैक्षणिक संस्थांमधील उपाहारगृहांची तपासणी मिशन मोडवर असून पुढील ८ ते १० दिवसांत परिणाम दिसतील' , असं तुकाराम मुंढे यांनी एएनआयशी बोलताना म्हटलं आहे.




शाळा आणि महाविद्यालयाबाबत एफडीएने काढलेल्या आदेशाचं पालन अद्यापही होताना दिसत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना काही ठिकाणी असुरक्षित खाद्यपदार्थ मिळत तर नाही ना? जर असं असेल तर काय कारवाई होणार? किंवा या संदर्भात संबंधित शैक्षणिक संस्थांशी काही चर्चा सुरू आहे का? या प्रश्नावर बोलताना तुकाराम मुंढे म्हणाले की, "या संदर्भात आपण मंगळवारी शिक्षण विभागाचे आयुक्त, सर्व जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी आणि सर्व जिल्ह्यातील एफडीएचे अधिकारी व सर्व जिल्हा परिषदांचे सीईओ या सर्व अधिकाऱ्यांची एक महत्वाची बैठक घेतली आहे. यामध्ये काय कारवाई करायची आणि काय पावलं उचलले पाहिजेत, याबाबत योग्य त्या सूचना देण्यात आल्या आहेत. आता पुढच्या ८ ते १० दिवसांत संपूर्ण चित्र स्पष्ट झालेलं असेल. काही ठिकाणी नियमांचं पालन होत नाही हे खरं आहे. त्याबाबत पुढील ८ ते १० दिवसांत कारवाईचे परिणाम दिसतील", असा इशारा तुकाराम मुंढे यांनी दिला.

'विमल इलायची'च्या नावाखाली होणाऱ्या सरोगेट (अप्रत्यक्ष) जाहिरातींप्रकरणी अन्न व औषध प्रशासनाने (FDA) बॉलिवूडचे दिग्गज अभिनेते शाहरुख खान, अजय देवगण आणि टायगर श्रॉफ यांना कारणे दाखवा नोटीस बजावल्याने सिनेसृष्टीत मोठी खळबळ उडाली. या प्रकरणात सेलिब्रिटींना १० लाखांचा दंड होऊ शकतो असं म्हणत कारवाईला उशीर झाला तरीही कारवाई होणारच असं तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केलं आहे.

## पेणमधील वादग्रस्त छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा हटविला

अलिबाग : (स. गांवकरी)

समाज माध्यमांवर सुरू झालेली टीका, रस्त्यावर उतरून छावा संघटनांनी केलेले आंदोलन आणि लेखी तक्रारी यांची दखल घेऊन पेण नगर परिषदेनी एक पाऊल मागे घेतले. नगराध्यक्षांनी जनभावना दुखावल्या प्रकरणी दिलगिरी व्यक्त केल्यानंतर, नव्याने बसविण्यात आलेला पुतळाही आता हटविला आहे. पेण शहरातील चिंचपाडा परिसरात संभाजी महाराजांचा पुतळा बसविण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून केली जात होती. छावा संघटना यासाठी पाठपुरवा करत होती. त्यांच्या मागणीची दखल घेऊन नगर परिषदेनी चिंचपाडा येथे छत्रपती संभाजी महाराजाचा पुतळा उभारण्याचा निर्णय घेतला होता. आमदार निधीतून २२ लाख रुपयांचा निधी यासाठी उपलब्ध करून देण्यात आला होता. स्थानिक आमदार रविशेठ पाटील यांच्या उपस्थितीत मॉडर्न आर्ट स्वरूपातील पुतळ्याचे अनावरण करण्यात आले होते. मात्र अनावरणानंतर काही तासातच या पुतळ्यावरून वाद निर्माण झाला. हा पुतळा आपत्तीजनक असल्याची तक्रार केली जाऊ लागली. मॉडर्न आर्ट स्वरूपातील या पुतळ्यावर सामाजिक संघटना आणि ऐतिहास प्रेंमीनी आक्षेप घेण्यास सुरुवात केली. पुतळ्या संभाजी महाराजांसारखा दिसतच नसल्याच्या तक्रारी होऊ लागल्या. समाज माध्यमांवर या पुतळ्याचे तीव्र पडसा उमटण्यास सुरुवात झाले. त्यामुळे नगर परिषदेच्या नगराध्यक्षांना दिलगिरी व्यक्त करण्याची वेळ आली. प्रशासनाच्या चुकीमुळे हा प्रकार झाल्याचे नगराध्यक्ष प्रीतम पाटील यांनी स्पष्ट केले. पुतळा तातडीने बदलण्यात येईल असेही त्यांनी जाहीर केले. या नंतर नगर पालिका प्रशासानाने सुरवातीला लाल कापड टाकून पुतळा झाकून टाकला. त्यानंतर जनतेचा रोष वाढण्याची शक्यता असल्याने, नगर परिषदेचे कर्मचारी रात्रीच चिंचपाडा येथे दाखल झाले. त्यांनी मध्यरात्री दोन वाजता पुतळा हटविला. आता याच ठिकाणी नवीन छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा बसविला जाणार आहे.



# शासकीय कंत्राटदारांचा आझाद मैदानावर एल्गार

**८६ हजार ६६२ कोटींच्या थकीत बिलांसाठी बेमुदत आंदोलन सुरू!**

**८६ हजार कोटींच्या थकीत बिलांवर कंत्राटदारांचा आक्रोश; मुंबईच्या आझाद मैदानावर शासनाविरोधात एल्गार!**







दरम्यान, "न्याय हक्कासाठी महाराष्ट्र शासनाविरुद्ध लढा, चलो आझाद मैदान!" असा नारा देत राज्यभरातील कंत्राटदार मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले आहेत. शासनाने प्रलंबित बिलांचा प्रश्न तातडीने सोडवला नाही, तर आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे. त्यामुळे आता राज्य सरकार या आंदोलनाची कितपत दखल घेते आणि थकीत बिलांबाबत कोणता निर्णय घेते, याकडे राज्यातील शासकीय कंत्राटदारांचे लक्ष लागले आहे.

(स. गांवकरी)

शासनाच्या विविध विभागांच्या माध्यमातून राज्यभर विकासकामे करणाऱ्या शासकीय कंत्राटदारांची गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली कोट्यवधी रुपयांची देयके तातडीने अदा करावीत, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य शासकीय कंत्राटदार फेडरेशनच्या वतीने आजपासून मुंबईतील आझाद मैदानावर राज्यव्यापी बेमुदत धरणे आंदोलनाला सुरुवात झाली. राज्यातील शासकीय कंत्राटदारांची तब्बल ८६ हजार ६६२ कोटी रुपयांची बिले थकीत असल्याचा दावा फेडरेशनने केला असून, या परिस्थितीमुळे दोन लाखांहून अधिक कंत्राटदार आर्थिक संकटात सापडल्याचे सांगण्यात आले.

ग्रामीण भागातील रस्ते, पाणीपुरवठा योजना, शासकीय इमारती, सार्वजनिक बांधकामे, आदिवासी विकास विभागाची कामे तसेच शहरी भागातील विविध विकासकामे कंत्राटदारांनी पूर्ण केली आहेत. अनेक कंत्राटदारांनी स्वतःची भांडवली रक्कम, बँक कर्ज, खासगी व्यक्तींकडून घेतलेली रक्कम तसेच सावकारांकडून कर्ज घेऊन ही कामे पूर्ण केल्याचे फेडरेशनचे म्हणणे आहे. मात्र कामे पूर्ण करूनही शासनाकडून वेळेवर देयके मिळत नसल्याने कर्जाचे हप्ते, व्याज, कामगारांचे वेतन, बांधकाम साहित्याची देणी, यंत्रसामग्रीचा खर्च, जीएसटी आणि इतर वैधानिक देणी भागविण्याचे मोठे संकट कंत्राटदारांसमोर उभे राहिले आहे.



**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर फेडरेशनचे प्रदेश उपाध्यक्ष राजाभाऊ पानसरे यांनी शासनाच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. गेल्या पाच वर्षांपासून शासकीय कंत्राटदारांची अवस्था बिकट असून, विकासकामे पूर्ण करूनही हक्काची बिले मिळत नसल्याने अनेकांचे व्यवसाय कोलमडले आहेत, असे त्यांनी सांगितले. "किती जणांचा बळी गेल्यानंतर सरकारला जाग येणार?" असा संतप्त सवाल पानसरे यांनी उपस्थित केला. आर्थिक विवंचनेमुळे काही कंत्राटदारांनी टोकाचे पाऊल उचलल्याचा दावाही त्यांनी केला.

"ठेकेदार म्हणजे चोर नव्हे. ठेकेदार हा शासनाची विकासकामे करणारा, आपल्या कौशल्याच्या जोरावर काम पूर्ण करणारा अभियंता आणि विकास प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक आहे," असे सांगत पानसरे यांनी कंत्राटदारांवर होणाऱ्या आरोपांबाबत नाराजी व्यक्त केली. निवडणुकीच्या काळात कंत्राटदारांची आठवण होते, निवडणुका संपल्यानंतर विकासकामे करण्यासाठी त्यांनाच आमंत्रित केले जाते; मात्र कामे पूर्ण झाल्यानंतर बिले देण्याची वेळ आली की शासनाची भूमिका बदलते, असा आरोप त्यांनी केला.

विभागनिहाय कोट्यवधींची देयके प्रलंबित : फेडरेशनच्या माहितीनुसार, सार्वजनिक बांधकाम विभागाची सुमारे १७ हजार ५०० कोटी रुपये, आदिवासी विकास विभागाची ९ हजार ८८१ कोटी रुपये, ग्रामविकास विभागाची १ हजार १८१ कोटी रुपये, पाणीपुरवठा विभागाची तब्बल ४० हजार कोटी रुपये, जलसंपदा विभागाची ७ हजार कोटी रुपये, पर्यटन विभागाची १ हजार १०० कोटी रुपये, तर इतर विविध विभागांची सुमारे १० हजार कोटी रुपयांची देयके प्रलंबित असल्याचा दावा करण्यात आला आहे.

मंत्र्यांवरही पानसरे यांचा निशाणा : प्रलंबित बिलांच्या प्रश्नावर राज्य सरकारमधील संबंधित मंत्र्यांनी गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे सांगताना राजाभाऊ पानसरे यांनी महायुती सरकारवरही टीका केली. विशेषतः आदिवासी विकास विभागाकडे मोठ्या प्रमाणावर कंत्राटदारांची बिले प्रलंबित असल्याचा दावा करत त्यांनी संबंधित विभागाच्या कारभारावर प्रश्न उपस्थित केले. शासनाने कंत्राटदारांच्या अडचणींकडे गांभीर्याने पाहून तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली. शासकीय देयके वेळेवर न मिळाल्याने कंत्राटदारांवरील आर्थिक भार दिवसेंदिवस वाढत आहे. बँकांकडून घेतलेल्या कर्जाचे व्याज वाढत असतानाच कामगारांचे वेतन, साहित्य पुरवठादारांची देणी, यंत्रसामग्रीचा खर्च, जीएसटी आणि इतर वैधानिक देणी नियमितपणे द्यावी लागतात. त्यामुळे अनेक छोटे व मध्यम कंत्राटदार व्यवसाय बंद करण्याच्या स्थितीत असल्याचे फेडरेशनने म्हटले आहे.

१५ ऑगस्टपर्यंतची पात्र बिले तातडीने देण्याची मागणी : फेडरेशनने शासनाकडे प्रलंबित असलेली १५ ऑगस्टपर्यंतची सर्व पात्र बिले तातडीने अदा करावीत, अशी प्रमुख मागणी केली आहे. प्रत्येक विभागातील प्रलंबित बिलांचा विभागनिहाय आढावा घेऊन कोणती बिले मंजूर आहेत, कोणत्या बिलांसाठी निधीची आवश्यकता आहे आणि कोणत्या कारणामुळे देयके रखडली आहेत, याचा स्पष्ट आढावा घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच प्रलंबित देयके निश्चित कालमर्यादेत अदा करण्याचे वेळापत्रक जाहीर करावे, आवश्यक निधीची तातडीने तरतूद करावी आणि मुख्यमंत्री, वित्तमंत्री, संबंधित विभागांचे मंत्री व वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत फेडरेशनच्या प्रतिनिधींची संयुक्त बैठक आयोजित करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

**फक्त सध्याची थकीत बिले अदा करून प्रश्न संपणार नाही. भविष्यात शासकीय कंत्राटदारांची बिले वर्षानुवर्षे प्रलंबित राहणार नाहीत, यासाठी कायमस्वरूपी आणि प्रभावी आर्थिक व्यवस्था निर्माण करावी, अशी मागणी फेडरेशनने केली आहे. वेळेवर देयके मिळणे हे केवळ कंत्राटदारांच्या आर्थिक हितासाठी नव्हे, तर राज्यातील विकासकामांची सातत्यपूर्ण अंमलबजावणी आणि बांधकाम क्षेत्राचे आर्थिक स्थैर्य टिकविण्यासाठीही आवश्यक असल्याची भूमिका फेडरेशनने मांडली.**

## थोडक्यात पण महत्वाचे

### तेली समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्काराचे आयोजन

अर्धापूर (स. गांवकरी) : जिल्ह्यातील तेली समाज सेवा भावी संस्थेच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती प्रसिद्धी प्रत्रकाव्दारे दिऊ आहे. प्रतिवर्षी प्रमाणे तेली समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा व विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार दि. २३ ऑगस्ट रोजी आयोजित केला आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये गुणवंत विद्यार्थ्यांने आपल्या गुणपत्रकाची माहिती प्रत सदरील ग्रुपवर टाकून त्याखाली आपले नाव,वर्ग कळवावा संपर्क मोबाईल नंबर शक्यतो झेरॉक्स प्रत पीडीएफ करून टाकावेत. वर्ग पहिली ते चौथी, पाचवी ते आठवी तसेच शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी वर्ग दहावी-बारावी, बी.कॉम, बीएससी, डी.फार्म, बी. फार्म, फार्मसी, बीएमएस, एमबीबीएस, सेट-नेट ,सिईटी आदी परीक्षेतील विद्यार्थ्यांनी ७५ टक्का पेक्षा जास्त गुण असणे आवश्यक आहे. बीएचएमएस, बीएएमएस, बीडीएस, एमबीबीएस, एमडी, नीट परीक्षा प्रवेश पात्र विद्यार्थी व उत्तीर्ण विद्यार्थी तसेच विविध कला या क्षेत्रात राज्य व केंद्रीय स्तरावर प्रमाणपत्र मिळालेले विद्यार्थी यांनी नाव नोंदणी करावी.फॉर्म भरल्यानंतर आपले प्रमाणपत्र व फॉर्म भरलेला स्क्रीन शॉट ग्रुरुपवर टाकावा, असे आवाहन तेली समाज सेवाभावी संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

### कृष्णापूर येथील शेतात बिबट्याचा थरारक रेस्क्यू

तामसा (स. गांवकरी) : हदगाव तालुक्यातील कृष्णापूर येथे शेतातील गजरा गवताच्या दाट पिकात बिबट्या लपल्याची माहिती मिळाल्यानंतर वनविभागाच्या पथकाची तब्बल चार तास धावपळ सुरू होती. अखेर गजरा गवताच्या शेतात ट्रॅक्टरच्या सहाय्याने शोधमोहीम राबवून बिबट्याचा बछडा मृत अवस्थेत ताब्यात घेण्यात आला. मृत का होईना पण बिबट्याचे पिल्लू सापडल्याने वन विभाग, शेतकरी व ग्रामस्थांनी सुटकेचा निःश्वास सोडला असला तरी बछड्याचा मृत्यू कशाने झाला? याबाबत अनेक तर्कवितर्क लावले जात आहे. हदगाव वन परिक्षेत्रांर्गत येणाऱ्या लोहा वन परिमंडळातील कृष्णापूर येथील दत्ता आनंदराव पवार यांच्या गट क्रमांक 43 मधील शेतात जनावरांसाठी चारा असलेल्या गजरा गवताच्या दाट पिकात बिबट्या लपल्याची माहिती दि. 18 रोजी मंगळवारी सकाळी 9 वाजताच्या सुमारास निदर्शनात आल्याने शेतकऱ्यांत खळबळ उडाली होती. सगळा गाव घटनास्थळी जमा झाला होता. वन विभागाला माहिती देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच हदगाव वनपरिक्षेत्र अधिकारी किशन खंदारे यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्याच आखाड्यावरील कुत्र्यांवर बिबट्याने हल्ला करुन एका कुत्र्याचा फडशा पाडला तर दुसऱ्या कुत्र्यावर हल्ला करून त्याचे कान फाडल्याचे पुढे आले. यामुळे शेतकरी, ग्रामस्थ भयभीत झाले होते. घटनेची माहिती माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांना कळताच ते घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी वन विभागाला तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. नांदेडचे वन्यजीव रक्षक अनिंद्र कट्टी यांनी वन अधिकारी, कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन परिस्थितीचा अंदाज घेत गजरा गवताच्या दाट शेतात शोधमोहीम सुरू केली. बिबट्या असल्याची खात्री करुन अत्यंत सावधपणे रेस्क्यू ऑपरेशन केले. गजरा गवत दाट असल्याने बिबट्याचा शोध घेणे वनकर्मचाऱ्यांसाठी मोठे आव्हान होते. अखेर, ट्रॅक्टरच्या सहाय्याने शोधमोहीम पुढे नेली. तब्बल चार तासांच्या अथक प्रयत्नानंतर बिबट्याचा बछडा सापडला. पण बछडा मृत अवस्थेत आढळल्याने सगळेच गोंधळून गेले. बछड्याच्या मृत्यूचे कारण स्पष्ट झालेले नसून शवविच्छेदनानंतरच कारण स्पष्ट होणार आहे. मृत बिबट्याच्या बछड्याला हदगाव येथे शवविच्छेदनासाठी नेले असून वनविभागाकडून बछड्याची आवश्यक तपासणी व पुढील कार्यवाही सुरू आहे.

### विषमते विरुद्धचा लढा आणि शिक्षणाची मशाल!

पारनेर (स. गांवकरी) : महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात बहुजन, दलित आणि शोषित घटकांच्या उद्धारासाठी झटणाऱ्या महापुरुषांचे विचार आजच्या पिढीपर्यंत पोहोचवणे अत्यंत गरजेचे आहे. याच पार्श्वभूमीवर, सावित्री फातेमा सद्भावना मंचच्या वतीने प्रा. कुमार आहेर( सर)यांच्या माध्यमातून प्रेरणास्थान, मुक्ता साळवे हिच्या जीवनकार्यावर आधारित एका अत्यंत महत्त्वपूर्ण 'एकपात्री प्रयोगाचे' आयोजन करण्यात आले. हा प्रयोग केवळ मनोरंजनाचा नसून, समता, बंधुता आणि न्यायाचे विचार घराघरांपर्यंत पोहोचवणारा एक ऐतिहासिक टप्पा ठरला आहे.

## तोष्णीवाल महाविद्यालयीन खेळाडूचे बुद्धिबळ स्पर्धेत यश

हिंगोली : (स. गांवकरी)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड व बी. रघुनाथ महाविद्यालय, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरमहाविद्यालयीन "ड" झोन बुद्धिबळ स्पर्धेमध्ये तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावत घवघवीत यश संपादन केले आहे. सदर स्पर्धेमध्ये महाविद्यालयीन खेळाडू ठोके निखिल परसराम, पाईकराव धम्मपाल दिलीप, भगत सिद्धार्थ प्रकाश, गडदे अविनाश अशोक, हराळ नामदेव साहेबराव, अभय सुरेश अन्नपूर्णे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. त्याच्या सदर



यशाबद्दल संस्थाध्यक्ष श्री. बी. आर.तोष्णीवाल,सचिव श्री. यू.एम. शेळके,उपाध्यक्ष श्री.सुभाषअप्पा एकशिंगे, महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष श्री. रमणजी तोष्णीवाल, प्राचार्य डॉ. एस.जी. तळणीकर तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले. क्रीडा विभाग प्रमुख डॉ.हेमंत शिंदे यांनी सदर खेळाडूला मार्गदर्शन केले.

## 'जेन झी' ने वास्तव स्वीकारून स्पर्धा परीक्षांची तयारी करावी : तहसीलदार

मुदखेड : (स. गांवकरी)

आजची 'जेन झी' पिढी ही तंत्रज्ञानाच्या युगात वाढलेली पिढी असून तिच्याकडे ज्ञान, माहिती आणि विविध संधींची कमतरता नाही. मात्र, डिजिटल माध्यमांचा योग्य वापर करून विद्यार्थ्यांनी आपल्या क्षमता व परिस्थितीची वास्तविकता स्वीकारणे आवश्यक आहे. सोशल मीडिया `आणि मोबाईलच्या आहारी न जाता त्यांचा ज्ञानार्जनासाठी प्रभावी वापर करावा आणि वास्तववादी ध्येय निश्चित करून स्पर्धा परीक्षांची तयारी करावी, असे प्रतिपादन मुदखेडचे तहसीलदार आनंद देऊळगावकर यांनी केले. राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड येथे नव्याने प्रवेशित बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'विद्यार्थी प्रवेश प्रेरणा कार्यक्रमात'




ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. 'पदवीनंतर करिअरच्या संधी व स्पर्धा परीक्षेची तयारी' हा कार्यक्रमाचा प्रमुख विषय होता. यावेळी तहसीलदार आनंद देऊळगावकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी केवळ मोठी स्वप्ने पाहणे पुरेसे नसून स्वतःची क्षमता, उपलब्ध वेळ, परिस्थिती आणि स्पर्धेचे वास्तव समजून घेणे गरजेचे आहे. जेन झीने कडे डिजिटल साधनांची मोठी ताकद आहे. या साधनांचा मनोरंजनापेक्षा अभ्यास, माहिती संकलन, चालू घडामोडी आणि ज्ञानवृद्धीसाठी उपयोग केल्यास त्याचा निश्चितच फायदा होईल.

विद्यार्थ्यांनी वेळेचे नियोजन, सातत्यपूर्ण अभ्यास, योग्य संदर्भ साहित्य, सराव परीक्षा आणि आत्मपरीक्षण यावर भर द्यावा. स्पर्धा परीक्षेतील अपयशाला घाबरून न जाता त्यातून आपल्या चुका ओळखून पुन्हा प्रयत्न करण्याची मानसिकता विकसित करावी. पदवी शिक्षणासोबतच भविष्यातील करिअरचे नियोजन केल्यास विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांतील संधींचा प्रभावीपणे लाभ घेता येईल, असेही त्यांनी नमूद केले. प्रमुख साधन व्यक्ती म्हणून पीपल्स कॉलेज, नांदेड चे उप प्राचार्य डॉ. विशाल पतंगे हे उपस्थित होते. त्यांनी पदवीनंतरच्या विविध करिअरच्या संधी तसेच स्पर्धा परीक्षांचे स्वरूप, अभ्यासक्रम, संदर्भ साहित्य, वेळेचे व्यवस्थापन आणि अभ्यासाचे नियोजन याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. पदवीच्या शिक्षणासोबतच स्पर्धा परीक्षांची तयारी केल्यास विद्यार्थ्यांना भविष्यातील संधींचा प्रभावीपणे लाभ घेता येईल, असे त्यांनी सांगितले.

## बीएलओची मतदार शोध मोहीम अंतिम टप्प्यात

मुदखेड : (स. गांवकरी)

तालुक्यात विशेष मतदार यादी पुनरीक्षण मोहीम तहसील प्रशासनामार्फत प्रभावीपणे राबवली जात असून प्रत्येक गावातील बीएलओ ना मतदार शोधताना पायपीट करावी लागत आहे . मतदार यादीतील मतदार प्रत्यक्षात गावातच राहत नसल्याचे चित्रसमोर आले असून अनेक घरे बंद तर काही कुटुंबे कायमस्वरूपी स्थलांतरित असल्याचे आढळून आले आहे . गेल्या अनेक वर्षांपासून मतदार यादीत असलेल्या वृत्त व्यक्तींना वगळण्यात येत असून नवीन मतदार यादी शुद्धीकरणाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असली तरीही गायब असलेले मतदार नव्या यादीतून डिलीट होणार असल्याच्या धास्तीने लोकप्रतिनिधी बीएलओची



मात्र तारांबळ उडाली आहे. भारत निवडणूक आयोग विशेष मतदार यादी पुनरीक्षण मोहीम अंतर्गत सन २००२ मतदार यादी नव्याने तयार केली जात आहे . यासाठी तालुक्यातील प्रत्येक गावात मतदार यादी दुरुस्ती प्रक्रियेचे काम प्रगतीपथावर आहे . उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी , तहसीलदार आनंद देऊळगावकर , पंचायत समिती गटविकास अधिकारी शेखर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावीपणे राबवली जात आहे. तहसील प्रशासनाने गाव पातळीवर शासकीय बीएलओची नियुक्ती केली आहे . यासोबत प्रमुख राजकीय पक्षाने प्रशासनाला सहकार्य करण्यासाठी बीएलओ नियुक्त केले आहेत . नवीन मतदार यादी शुद्धीकरणाची प्रक्रिया ता 20जून 2026 पासून वेगात सुरू आहे . प्रत्येक गावात याबाबत जनजागृती करण्यासाठी नायब तहसीलदार मारुती जाधव , नायब तहसीलदार विजयकुमार पाटे, नायब तहसीलदार संतोष कामठेकर यांच्यासह तलाठी, ग्रामसेवक, शिक्षक, अंगणवाडी सेविका, सेवाभावी संस्था आदींनी पुढाकार घेतला आहे. मतदार यादी शुद्धीकरण प्रक्रिया राबवित असताना बीएलओ यांना सर्व बाबीची बारकाईने तपासणी करावी लागत आहे . रोजगार शिक्षण व्यवसायासाठी शहराकडे स्थलांतरित झालेल्या अनेक कुटुंबीयांची नावे अद्यापही गावातील मतदार यादीत कायम असल्याचे पडताळणीत आढळून आले आहे. अनेक घरांना कुलूप असून बीएलओना वारंवार चक्रा माराव्या लागत आहे . याशिवाय काही ठिकाणी एकाच व्यक्तीचे दोन वेगवेगळ्या प्रभागातील मतदार यादीत नाव असल्याचे आढळून आले आहे.

## तिरंग्याला सेवाकाळातील शेवटचा सलाम; आठवणींनी भरून आले राजू मैड यांचे मन!

राजूर : (स. गांवकरी)

१५ ऑगस्टचा दिवस... दरवर्षीप्रमाणे यंदाही तिरंगा अभिमानाने फडकत होता; मात्र आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, राजूर येथील राजू मैड यांच्यासाठी हा स्वातंत्र्यदिन विशेष भावनिक ठरला. येत्या ३० नोव्हेंबर रोजी त्यांची प्रदीर्घ शासकीय सेवा संपणार असल्याने सेवाकाळातील हा त्यांचा शेवटचा स्वातंत्र्यदिनाचा सोहळा ठरला. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील काही वर्षांचा अपवाद वगळता दरवर्षी २६ जानेवारी आणि १५ ऑगस्टच्या ध्वजारोहणाला उपस्थित राहून तिरंग्याला सलामी देण्याचा मान त्यांना मिळाला.



सेवाजीवनातील पहिल्या दिवसापासून आजपर्यंतचा प्रदीर्घ प्रवास, सहकारी, वरिष्ठ अधिकारी, विविध जबाबदाऱ्या, चढ-उतार, यश-अपयश आणि असंख्य आठवणी तिरंग्याला सलाम करताना त्यांच्या डोळ्यांसमोर तरळून गेल्या. तिरंग्याला सलाम करताना मन मात्र भावनांनी भरून आले. "या तिरंग्याखाली उभे राहून देशसेवा आणि कर्तव्य बजावण्याची संधी मिळाली, हीच माझ्या सेवाजीवनातील सर्वात मोठी अभिमानाची बाब आहे," अशी भावना राजू मैड यांनी व्यक्त केली.

## येरवडा पोलिसांची धडक कारवाई; चोरीच्या विदेशी दारूसह दोघांना अटक

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गिते यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाची कामगिरी; २७ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त**

पुणे : (स. गांवकरी)

येरवडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी तसेच अवैध शस्त्रे, चोरीच्या घटना आणि अन्य बेकायदेशीर कृत्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी येरवडा पोलिसांनी विशेष गस्त आणि तपास मोहीम राबवली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गिते यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या कारवाईत चोरीच्या विदेशी दारूच्या सहा बाटल्यांसह दोघांना अटक करण्यात आली. या कारवाईत तब्बल २७ हजार २०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुणे शहरातील वाढत्या गुन्हेगारीला प्रतिबंध करण्यासाठी पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सह पोलीस आयुक्त संजय दराडे आणि अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग मनोज पाटील यांनी येरवडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हे प्रतिबंधक कारवाई अधिक प्रभावी करण्याच्या सूचना दिल्या होत्या. या सूचनांची अंमलबजावणी करत वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गिते यांनी पोलीस ठाण्याच्या तपास पथकाला सतर्क राहून संशयित व्यक्ती, वाहनचोरी तसेच अवैध वस्तूंची वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले.

त्यानुसार दि. १८ ऑगस्ट




२०२६ रोजी तपास पथकाचे प्रभारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक किशोर बेरड यांच्या नेतृत्वाखाली पोलीस पथक येरवडा परिसरात गस्त घालत होते. यावेळी पोलीस अंमलदार संदिप जायभाय यांना जी.एस.टी. कार्यालयाजवळ काही इसम संशयास्पदरीत्या थांबले असून, त्यांच्याकडे चोरीचे साहित्य असण्याची शक्यता असल्याची गोपनीय माहिती मिळाली.

ही माहिती त्यांनी तात्काळ वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गिते यांना दिली. माहितीचे गांभीर्य लक्षात घेऊन गिते यांनी तत्काळ कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यांच्या आदेशानुसार तपास पथकाने मिळालेल्या माहितीची खातरजमा केली असता सह्याद्री रुग्णालयाकडून जी.एस.टी. कार्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील मोकळ्या जागेत दोन इसम संशयास्पदरीत्या थांबलेले आढळून आले.

पोलिसांनी दोघांची चौकशी केली असता त्यांनी तेथे थांबण्याबाबत समाधानकारक माहिती दिली नाही. त्यामुळे त्यांच्या ताब्यातील बॅगेची तपासणी करण्यात आली. बॅगेमध्ये विदेशी दारूच्या सहा बाटल्या आढळून आल्या. पोलिसांनी त्यांच्याकडे दारूच्या बाटल्यांबाबत विचारणा केली असता त्यांना समाधानकारक स्पष्टीकरण देता आले नाही. पोलिसांनी दोघांना येरवडा पोलीस ठाण्यात आणून अधिक चौकशी केली. त्यावेळी त्यांनी सदर विदेशी दारूच्या बाटल्या कल्याणीनगर येथील टॉनिक आऊटलेटमधून चोरी केल्याची कबुली दिली.

# थोडक्यात पण महत्वाचे



## रावेर पोलिसांची विशेष वाहतूक मोहीम

■ नियमभंग करणाऱ्यांवर कडक कारवाई !

रावेर (स. गांवकरी) : जळगाव जिल्ह्याचे मा. पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरोधात विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. त्याअंतर्गत रावेर पोलीस स्टेशन हद्दीत दि. १७ ऑगस्ट २०२६ पासून वाहन तपासणी व कारवाईला सुरुवात करण्यात आली आहे. या मोहिमेत अल्पवयीन मुलांकडून वाहन चालविणे, ट्रिपल सीट, हेल्मेटविना वाहन चालविणे तसेच इतर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे. विशेषतः आदिवासी भागातून तसेच आदिवासी भागात अवैध व धोकादायक पद्धतीने मजुरांची वाहतूक करणाऱ्या वाहनांवरही पोलिसांचे लक्ष असून, यापूर्वी अशा वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. रावेर पोलिसांकडून वाहनांची तपासणी अधिक काटेकोरपणे करण्यात येत असून, वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे पालन करून सुरक्षित प्रवास करावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. ही विशेष मोहीम संपूर्ण आठवडाभर सुरू राहणार असून नियमभंग करणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई केली जाणार आहे.

## डॉ. राजश्री बोरसे यांच्या हस्ते ध्वजारोहण



भेंडी (स. गांवकरी) : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भेंडी येथे १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात, आनंदात आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने शाळेत विविध देशभक्तीपर व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. राजश्री बोरसे यांच्या हस्ते जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भेंडी येथील ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहण होताच उपस्थित विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थांनी राष्ट्रगीताचे सामूहिक गायन करून तिरंग्याला मानवंदना दिली. 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्' अशा देशभक्तीपर घोषणांनी शाळेचा परिसर दुमदुमून गेला. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत देशभक्तीपर गीते, भाषणे, कविता तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातून देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता आणि स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची भावना प्रभावीपणे व्यक्त झाली. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळालेल्या या व्यासपीठामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. यावेळी मार्गदर्शन करताना उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्याचे महत्त्व जाणून घेत शिक्षण, संस्कार, शिस्त आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवावी, असे आवाहन केले. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी स्वातंत्र्यसैनिकांनी केलेले बलिदान भावी पिढीने सदैव स्मरणात ठेवावे आणि आपल्या कर्तृत्वातून देशाच्या प्रगतीत योगदान द्यावे, असा संदेश यावेळी देण्यात आला.

## पालकमंत्री गिरीश महाजनांकडून कामे मार्गी लावण्याचे आश्वासन



कनाशी (स. गांवकरी) : राज्याचे कुंभमेळा मंत्री तथा नाशिकचे नवे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी पदभार स्वीकारल्यानंतर सुरगाणा तालुक्याचे भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष व विद्यमान नगरसेवक रमेश थोरात यांनी त्यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी सुरगाणा तालुक्याच्या विकास कामांसह विविध गंभीर प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. भेटीत रमेश थोरात यांनी पालकमंत्री महाजन यांचे पुष्पगुच्छ देऊन मनःपूर्वक अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या. गिरीश महाजन आणि रमेश थोरात यांचे दीर्घकाळचे निकटचे संबंध आहेत. या नात्याचा आधार घेत थोरात यांनी सुरगाणा तालुक्यातील आदिवासीबहुल भागातील पाणी, रस्ते, आरोग्य, रोजगार आणि शासकीय योजनांच्या अंमलबजावणीतील अडचणी पालकमंत्र्यांसमोर मांडल्या. विशेषतः जलजीवन मिशन, ग्रामीण रस्ते, आरोग्य उपकेंद्रे आणि आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासंदर्भातील प्रश्नांवर त्यांनी लक्ष वेधले. सुरगाणा हा दुर्गम आणि डोंगराळ तालुका असल्याने येथील विकासासाठी विशेष निधी आणि शासकीय यंत्रणेची गती आवश्यक असल्याचे थोरात यांनी सांगितले. पालकमंत्री गिरीश महाजन यांनी थोरात यांना दिलासा देत म्हटले की, सुरगाणा तालुक्याचा विकास हे आमचे प्राधान्य आहे. आपण मांडलेले सर्व प्रश्न आणि प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी आम्ही पुरेपूर प्रयत्न करू. मंत्रालय स्तरावरून देखील याचा पाठपुरावा केला जाईल. या भेटीमुळे सुरगाणा तालुक्यातील विकास कामांना नवी गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. पालकमंत्रीपदी महाजन यांची निवड झाल्याने भाजप कार्यकर्त्यांमध्ये देखील उत्साहाचे वातावरण आहे. भेटीदरम्यान दोन्ही नेत्यांमध्ये तालुक्याच्या राजकीय घडामोडी आणि आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने देखील चर्चा झाल्याचे समजते.

## काठेवाडी शाळा म्हणजे अंदमान निकोबार बेट



जुन्नर तालुका (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील उत्तरेकडे अतिदुर्गमआदिवासी भागात काठेवाडी जि.परिषद प्राथमिक शाळा म्हणजे अंदमान निकोबार बेटासारखी या शाळेत विद्यार्थ्यांना हजेरी लावणे म्हणजे अग्निदिव्यच म्हणावे लागेल. जुन्नर तालुक्यातीलउत्तरे कडील अतिदुर्गम समजला जाणाऱ्या कोपरे-जांभुळशी या ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील मांडवी नदीपल्याड जांभुळशी बांगरवाडी आणि काठेवाडी- माळीवाडी मिळून तीन जिल्हा परिषद प्राथमिक शाळाआहेत मात्र यातील काठेवाडीची शाळेतील विद्यार्थ्यांना पावसाळ्यात शाळेत जावे की नको रोज यक्षप्रश्न पालकांना देखील पडतो त्याचे कारण देखील तसेंच आहे. कारण हा भाग म्हणजे जुन्नर तालुक्या तील चेरापुंजी म्हणून ओळख ला जातो पावसाळ्यात येथे पावसाचे प्रमाण जास्त असते शिवाय उंचच उंच डोंगर कडे त्यावरून कोसळणारे पाण्याचे प्रवाह त्यातून वाट काढत शाळेत जाणे म्हणजे जीवावर उदार होऊन जाणे होय. यामुळे माळीवाडी ठोंगेरे वस्ती जिल्हा परिषद च्या मुलांना मोठी कसरत करावी लागते व पाण्यातून पायपीट करावी लागते देशाला ८० वर्ष झाले तरी आजही येथे दळण वळण करण्यायोग्य रस्ता नाही अत्यंत दैयनिय अवस्था आहे पेसा अंतर्गत आदिवासीं ग्राम पंचायतींना एवढा निधी येतो मग तो जातो कुठे असा प्रश्न उपस्थित केला जात आहे लोकप्रतिनिधींनी याकडे लक्ष दिले पाहिजे.

# सावकारशाहीचा विळखा : तरुणाईचा घोट घेत असलेल मूक संकट

मंचर : (स. गांवकरी)



देशाची वाटचाल सरकार प्रगतीपथावर घेऊन जात असतानाच आज एका बाजूला शासन "स्टार्टअप", "मेक इन इंडिया", "मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना" आणि स्वयंरोजगाराच्या माध्यमातून तरुणांना उद्योग-व्यवसायाकडे वळविण्याचा प्रयत्न करत आहे. दुसऱ्या बाजूला मात्र ग्रामीण भागातील वास्तव वेगळे चित्र दाखवत आहे.कोरोनाकाळापासून आर्थिक अडचणीत सापडलेला व्यवसाय उभा करण्यासाठी धडपडणारा किंवा अचानक पैशांची गरज भासलेला तरुण आज पुन्हा खाजगी सावकारांच्या दारात उभा राहत आहे. ही परिस्थिती केवळ चिंताजनक नाही तर राज्याच्या आर्थिक आणि सामाजिक आरोग्यासाठी धोक्याची घंटा आहे.

आंबेगाव तालुक्यात खाजगी सावकारशाही पुन्हा बळावत असल्याची चर्चा सर्वत्र ऐकायला मिळत आहे.पैशाची तातडीची गरज,बँकांच्या कर्ज प्रक्रियेतील विलंब आणि आर्थिक विवंचना यामुळे अनेक नवउद्योजक खासगी सावकारांकडून कर्ज घेतात. सुरुवातीला मदतीचा हात वाटणारा हा व्यवहार पुढे अवाजवी व्याज,मानसिक छळ,धमक्या आणि आर्थिक गुलामगिरीत बदलतो.कर्ज फेडण्यासाठी पुन्हा कर्ज, त्यावर व्याज आणि व्याजावर व्याज अशा दुष्टचक्रात अनेक कुटुंबे अडकतात.

सर्वात वेदनादायी बाब म्हणजे अनेक तरुण हे सर्व सहन करत असतात;पण भीती, सामाजिक प्रतिष्ठा आणि कुटुंबाच्या अब्रूच्या चिंतेपोटी तक्रार करण्यास पुढे येत नाहीत. काही जण नैराश्याच्या गर्तेत जातात,तर काहीजण आत्महत्येसारखे टोकाचे निर्णय घेतात.प्रत्येक अशा घटनेनंतर समाज हळहळ व्यक्त करतो,प्रशासन हालचाल करते; पण काही दिवसांनी पुन्हा सर्व काही पूर्ववत होते. हा दुष्टचक्र कधी थांबणार?

गावोगावी भिशी,खासगी आर्थिक व्यवहार किंवा इतर माध्यमांचा वापर करून सावकारी केली जात असल्याच्या चर्चा होत आहेत.काही प्रभावशाली व्यक्ती या व्यवहारांमध्ये असल्याचे आरोपही वारंवार पुढे येतात.या आरोपांचे सत्य शोधणे आणि कायद्यापुढे सर्वांना समान वागणूक देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. कोणताही व्यक्ती कितीही प्रभावशाली असला तरी कायद्यापेक्षा मोठा असू शकत नाही.

याहून गंभीर प्रश्न म्हणजे पोलिस आणि संबंधित यंत्रणांनी केवळ तक्रारीची वाट पाहायची का? ज्याला जीवाची भीती आहे, ज्याच्या घरावर सावकारांचा दबाव आहे,तो तक्रार कशी करणार? त्यामुळे गुप्त माहिती, स्थानिक यंत्रणा आणि गुप्त तपासाच्या माध्यमातून बेकायदेशीर सावकारीचा शोध घेऊन कठोर कारवाई करणे हीच खरी कायद्याची अंमलबजावणी ठरेल. आज गरज आहे ती केवळ गुन्हे दाखल करण्याची नाही,तर तरुणांमध्ये विश्वास निर्माण करण्याची.पीडितांना कायदेशीर संरक्षण, गोपनीयतेची हमी आणि तातडीची मदत मिळाली,तरच ते पुढे येतील.अन्यथा सावकारशाहीचे जाळे अधिक मजबूत होत राहील आणि त्यात अनेक कुटुंब उद्ध्वस्त होतील.राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन राज्यभर बेकायदेशीर सावकारी विरोधात विशेष मोहीम राबविण्याची वेळ आली आहे. पोलिस, सहकार, महसूल आणि आर्थिक गुन्हे शाखेच्या संयुक्त कारवाईद्वारे अशा रॅकेटचा पर्दाफाश करणे आवश्यक आहे. कायद्याचा धाक केवळ सामान्य नागरिकांवर नव्हे, तर कायदा मोडणाऱ्यांवरही दिसला पाहिजे. सावकारकी कर्ज घेत असताना समोर अनेक समस्या असतात सावकार देखील याच संधीचा फायदा घेत सुमारे तीन टक्के पासून तर 20 टक्क्यांपर्यंत हे कर्ज द्यायला लगेच तयार होतात त्या बदल्यात ते समोरच्या व्यक्तीकडून चेक म्हणजेच धनादेश किंवा जमीन साठेखात करून घेतात समोरचा पैसे घेणारा व्यक्ती अडचणीत असतो त्यामुळे तो हे सर्व व्यवहार करण्यासाठी लगेच तयार होतो आणि याच संधीचा फायदा घेत त्याच कर्जावर पुन्हा व्याज परत तेच कर्ज त्याच्यावर पुन्हा व्याज आणि कर्ज मिटवून झाले की तुला परत कर्ज देतो या आमिषाने प्रथम ॲडव्हान्स घेतो आणि तो ऍडव्हान्स देखील परत त्या व्यक्तीला पुन्हा रिटर्न दिला जात नाही कर्जदार मेटाकुटीस येऊन अक्षरशः आत्महत्येच्या पर्यंत जाऊन घराची राख रांगोळी झाल्याशिवाय राहत नाही हेच सत्य... तरी या गोष्टीला कुठेतरी आळा घालण्याचे काम सरकारने करावे अशीच काहीशी मागणी समाजातून होत असताना दिसत आहे म्हणजेच बळी तोच कानफळी याचा प्रत्यय आता येऊ लागला आहे.

## पावणेश्वर मंदिरात पहिल्या श्रावणी सोमवारी भाविकांची मोठी गर्दी!



नवी मुंबई : (स. गांवकरी)

पहिल्या श्रावणी सोमवारनिमित्त नवी मुंबईतील पावणे गाव येथील पावणेश्वर मंदिरात भाविकांनी मोठ्या संख्येने दर्शनासाठी गर्दी केली. दिवसभर मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण पाहायला मिळाले. भाविकांकडून 'ॐ नमः शिवाय'चा जयघोष करण्यात येत असल्याने संपूर्ण परिसर शिवमय झाला होता.

पावणे गाव ग्रामस्थ मंडळींच्या वतीने मंदिरात येणाऱ्या भाविकांसाठी फराळ, चहा आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच कावड यात्रेत सहभागी झालेल्या भाविकांचीही मोठी उपस्थिती होती. कावड यात्रेमुळे मंदिर परिसरात धार्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने पावसाळ्यात नागरिकांनी घ्यावयाच्या काळजीबाबत जनजागृती करणाऱ्या आकर्षक कलाकृती मंदिर परिसरात सादर करण्यात आल्या होत्या. या माध्यमातून नागरिकांना पावसाळ्यात सुरक्षितता आणि आरोग्याची काळजी घेण्याचा संदेश देण्यात आला.

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटनेच्या तालुकाध्यक्ष पदी प्रा विजय कापसे तर सचिव पदी विनोद जवरे

कोपरगाव : (स. गांवकरी)





पत्रकारांच्या हक्कांसाठी, प्रश्नांसाठी आणि अडचणींच्या काळात सदैव खंबीरपणे पाठीशी उभी राहणारी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटनेची कोपरगाव तालुका व शहर कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. संघटनेचे राज्य अध्यक्ष निलेश सोमानी, राज्य संघटक संजय भोकरे, प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष अनिल कोळसे व जिल्हा निवड समिती अध्यक्ष सोमनाथ काळे, जिल्हा सरचिटणीस जनार्दन जगताप यांच्या आदेशाने कोपरगाव तालुका व शहर कार्यकारीनी जाहीर करण्यात आली.

या कार्यकारिणी मध्ये कोपरगाव तालूका अध्यक्ष पदी प्रा विजय कापसे तर सचिव पदी विनोद जवरे यांची निवड करण्यात आली तर ज्येष्ठ पत्रकार व पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली संघटनेच्या कार्याला अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी तालुका उपाध्यक्षपदी निवृत्ती शिंदे, तालुका कार्याध्यक्षपदी किसन पवार, शहराध्यक्षपदी हाफिज शेख, शहर उपाध्यक्षपदी रवी वाघडकर, शहर कार्याध्यक्षपदी स्वप्निल कोपरे, तालुका संघटकपदी सोमनाथ डफळ, शहर संघटकपदी संजय लाड, तालुका खजिनदारपदी अमोल गायकवाड, तालुका प्रसिद्धी प्रमुखपदी विशाल लोंढे, सल्लागारपदी काका खर्डे व दिनेश जोशी, संपर्कप्रमुखपदी राजेंद्र तासकर यांची निवड करण्यात आली. तसेच ज्येष्ठ सदस्य म्हणून फकीरराव टेके, सतीश जाधव, मिलिंद विघे, प्रमोद पवार यांची निवड करण्यात आली.

याप्रसंगी जिल्हा सरचिटणीस जनार्दन जगताप नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा देताना सांगितले की, "महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटना ही केवळ पत्रकारांच्या प्रश्नांपुरती मर्यादित न राहता सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातही सातत्याने कार्य करणारी संघटना आहे.

पत्रकारांच्या सुख-दुःखात सहभागी होत त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी संघटना नेहमीच पुढाकार घेणारी एकमेव संघटना असल्याचे सांगितले तर तालुकाध्यक्ष विजय कापसे यांनी, "वरिष्ठ पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन आणि सर्व पत्रकार बांधवांची साथ घेऊन आगामी काळात संघटनेचे कार्य अधिक व्यापक करत पत्रकारांच्या अडचणी, प्रश्न व हक्कांसाठी संघटना सातत्याने प्रयत्नशील राहत सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य व जनजागृतीचे विविध उपक्रम तालुकाभर राबवत संघटनेत प्रत्येक पत्रकाराला सन्मानाचे स्थान देत सर्वांना सोबत घेऊन एकजुटीने काम केले जाईल असे विश्वास देत सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

## स्कुटीवर घराबाहेर पडली; सकाळी दोड्डी रस्त्यावर मृतदेहच सापडला

अक्कलकोट : (स. गांवकरी)





रविवार 16 ऑगस्ट रोजी दुपारी दिड वाजता भाग्यश्री गायकवाड (वय 32 ) या विवाहित महिला त्यांच्या राहत्या घरामधून स्कुटीवर घराबाहेर पडली. परंतु सोमवार दिनांक 17 ऑगस्ट 26 रोजी कुंभारी दोड्डी रस्त्यावर त्यांचा मृतदेहच आढळून आला .मृतदेहाशेजारी मोठा दगड सापडला तर बाजूला त्यांची स्कुटी गाडी उभी असलेली दिसली ही घटना वळसंग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दोड्डी कुंभारी रस्त्यांवर कुंभारी गावाजवळ घडली असून 32 वर्षीय विवाहित महिलेचा खून झाला असल्याचे स्पष्ट झाले आहे. भाग्यश्री गायकवाड या जुळे सोलापूर मधील रहिवासी असल्याचे कळते.

वळसंग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कुंभारी गावा लगतच्या या घटनेने परिसरातील नागरिकांमध्ये मोठी खळबळ उडवून दिली आहे. ३२ वर्षीय भाग्यश्री गायकवाड या विवाहित महिलेचा संशयास्पद मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना वळसंग पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली आहे. आदल्या दिवशी म्हणजे रविवार दिनांक 16 ऑगस्ट रोजी घरातून अचानक बेपत्ता झालेल्या या महिलेचा मृतदेह दुसऱ्या दिवशी सोमवार दिनांक 17 ऑगस्ट रोजी रस्त्याच्या कडेला सापडल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यांच्या बाजूलाच मोठा दगड ही पडलेला आढळून आला आहे तर त्यांची स्कुटी जवळच उभी करण्यात आली होती.

घटनेचे सविस्तर वृत्त असे की, भाग्यश्री नानासाहेब गायकवाड (वय ३२) असे मृत विवाहितेचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, भाग्यश्री या १६ ऑगस्ट रोजी दुपारी राहत्या घरातून बाहेर पडल्या होत्या. मात्र, उशिरापर्यंत त्या घरी परतल्या नाहीत. कुटुंबाने त्यांचा सर्वत्र शोध घेण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांचा काहीही ठावठिकाणा लागला नाही. त्यानंतर १७ ऑगस्ट रोजी कुंभारी-दोड्डी रस्त्याच्या कडेला त्यांचा मृतदेह आढळून आला.

या घटनेची माहिती मिळताच वळसंग पोलिसांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळाची पाहणी केली असता, मृतदेहाजवळच त्यांची दुचाकी पडलेली पोलिसांना आढळली. शिवाय, याच ठिकाणी एक मोठा दगडही पोलिसांना सापडला आहे. या परिस्थितीमुळे हा मृत्यू नेमका कशामुळे झाला, असा मोठा संशय निर्माण झाला आहे. हा केवळ अपघात असू शकतो की कोणीतरी जाणीवपूर्वक त्यांची हत्या केली आहे, अशा दोन्ही दिशांनी सध्या तर्कवितर्क लावले जात आहेत. वळसंग पोलिसांनी त्वरित पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात पाठवला आहे. शवविच्छेदनाचा वैद्यकीय अहवाल प्राप्त झाल्यानंतरच या संशयास्पद मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होऊ शकेल. दरम्यान, भाग्यश्री घरातून नेमक्या कुठे निघाल्या होत्या आणि त्या रात्री त्यांच्यासोबत नक्की काय घडले, याचा सखोल आणि वेगाने तपास पोलिसांकडून सुरू आहे. अपघाताबरोबरच घातपाताच्या शक्यतेनेही या प्रकरणाची कसून चौकशी केली जात आहे.

## न्यूयॉर्कमध्ये शिवछत्रपतींची भव्य मिरवणूक

न्यूयॉर्क : (स. गांवकरी)



भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने १६ ऑगस्ट रोजी न्यूयॉर्कमध्ये आयोजित करण्यात आलेल्या इंडिया डे परेडमध्ये छत्रपती फाउंडेशन, न्यूयॉर्कच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य कीर्तीरथ सादर करण्यात आला. या कीर्तीरथामुळे न्यूयॉर्कच्या मॅडिसन अव्हेन्यूवर महाराष्ट्राचा इतिहास, संस्कृती आणि लोककलेचा दिमाखदार जागर पाहायला मिळाला. कीर्तीरथासोबत जल्लोष ढोल-ताशा पथकाच्या ५० हून अधिक वादकांनी ढोल-ताशांचा गजर करत संपूर्ण परिसर दुमदुमून टाकला. रुद्रा नृत्य समूहाच्या कलाकारांनी विविध लोकनृत्ये, तर लिव्हिंगस्टनचा राजा समूहाच्या युवतींनी लेझीम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कीर्तीरथावर छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ, बाल शिवबा आणि मावळ्यांच्या भूमिका साकारण्यात आल्या. बालक, महिला आणि युवकांनी आकर्षक वेशभूषा व प्रभावी अभिनयातून शिवकालीन इतिहास जिवंत केला. शंभरहून अधिक सहभागींच्या माध्यमातून महाराष्ट्राचा इतिहास आणि संस्कृती सातासमुद्रापार पोहोचविण्यात आली. भारतीयांसोबतच अमेरिकन नागरिक तसेच विविध देशांतून आलेल्या नागरिकांनीही मोठ्या उत्साहाने परेडचा आनंद घेतला. पारंपरिक पोशाख, ढोल-ताशे, नृत्य, संगीत आणि ऐतिहासिक देखावे यांचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले.



### श्रीक्षेत्र नामयज्ञ सोहळा ट्रस्टच्यावतीने

## पांडुरंगाच्या महाद्वारी 'नामयज्ञ सोहळा'

पुणे : (स. गांवकरी)

श्रीक्षेत्र नामयज्ञ सोहळा ट्रस्ट यांच्या वतीने चातुर्मासातील श्रावणी मासामध्ये श्रीक्षेत्र पंढरपूर येथे विठ्ठलाचे महाद्वार वीणा मंडपात 'नामयज्ञ सोहळा' हरिनामाच्या गजरात उत्साहात पार पडला. या सोहळ्याचे आयोजन श्री विठ्ठल प्रासादिक भजनी मंडळ, श्री शिवशंकर सांप्रदायिक भजनी मंडळ आणि पंचक्रोशी वारकरी संप्रदाय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. पहाटे काकडा आरती, नामस्मरण, प्रवचन, हरिपाठ, हरिजागर आणि सकाळी आणि सायंकाळी हरिकीर्तन असे सोहळ्याचे स्वरूप होते. ह.भ.प. सदाशिव महाराज बैकर, चंद्रकांत महाराज मांडवकर, जगन्नाथ महाराज सकपाळ, सुधाकर महाराज बगडे, दत्ताराम महाराज आयरे, अक्षय महाराज मते, काल्याचे कीर्तन निवृत्ती महाराज मुकनाक यांचे झाले. ह.भ.प. प्रवीण महाराज भागडे, महादेव महाराज जाबरे आणि प्रकाश महाराज सोलकर यांचे प्रवचन झाले.

यावेळी श्रीसंत नामदेव महाराजांचे सोळावे वंशज ह.भ.प. माधव महाराज नामदास (पंढरपूर) यांच्या हस्ते 'श्री संत सेवा गौरव पुरस्कार' ह.भ.प. दत्ताराम महाराज आयरे (चिपळूण) आणि ह.भ. प. शंकर महाराज भारदे (दापोली) यांना प्रदान करण्यात आला. शंकर महाराज भारदे म्हणाले, मला अनेक पुरस्कार मिळाले परंतु अध्यात्म आणि समाज प्रबोधनातून हा मिळालेला 'संत सेवा पुरस्कार' माझ्यासाठी सर्वश्रेष्ठ आहे.

पंढरीचा महिमा ।। देता
आणीक उपमा ।।
ऐसा ठाव नाहीं कोठें ।
देव उभाउभी भेटे ।।
आहेति सकळ । तीर्थे
काळें देती फळ ।।
तुका म्हणे पेठ । भूमिवरी हे वैकुंठ ।।

तुकाराम महाराजांनी अभंगात म्हटल्याप्रमाणे या भूवरील वैकुंठाचा निरोप घेताना सर्व भाविकांचे डोळे पाण्याने भरून आले होते.

कार्यक्रमाचे हे पाचवे वर्ष असून तीन हजार जणांनी या नामयज्ञ सोहळ्याचा लाभ घेतला. रामकृष्ण हरीच्या ठेक्यात आणि टाळ-मृदंगाच्या तालावर पावल्या तर महिला भाविकांनी फुगड्या खेळून आनंदोत्सव साजरा केला. सर्व विठ्ठलभक्त भक्तिरसात न्हाऊन निघाले. सोहळ्यात महिला वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सत्कार आणि स्वागत श्रीक्षेत्र नामयज्ञ सोहळा ट्रस्टचे अध्यक्ष ह.भ.प. निवृत्ती महाराज मुकनाक आणि उपाध्यक्ष काशिनाथ महाराज शिगवण यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद महाराज राणे यांनी केले. आभार जगन्नाथ महाराज सकपाळ यांनी मानले.

# हजार कोटींचे भूखंड बिल्डरांच्या घशात घालण्याचा भाजपचा डाव

सोलापूर : (स. गांवकरी)



सोलापूर महानगरपालिकेच्या आरक्षित जागा शासनाची मंजुरी न घेता त्या जागा BOT तत्त्वावर खासगी विकासकांना देण्याच्या प्रस्तावाला महाविकास आघाडीच्या घटक पक्षांनी तीव्र विरोध केला आहे. टक्केवारीसाठी शहरातील अत्यंत मोक्याच्या नऊ भूखंडांचे आरक्षण उठवून ते बिल्डरांच्या घशात घालण्याचा भाजपचा डाव असून, या विरोधात सोलापूर शहर महाविकास आघाडीच्या घटक पक्षांच्या वतीने आज सोलापूर महानगरपालिका आयुक्तांची भेट घेऊन या प्रस्तावाविरोधात निवेदन देण्यासाठी वेळ मागण्यात आली होती. मात्र, वेळ निश्चित करूनही आयुक्त डॉ. सचिन ओंबासे कार्यालयात उपस्थित नसल्याने तसेच दूरध्वनीवरून संपर्क साधूनही ते उपलब्ध न झाल्याने अखेर आयुक्तांच्या कार्यालयाच्या दरवाजावर निवेदन चिटकवून महाविकास आघाडीच्या वतीने निषेध नोंदविण्यात आला. त्यानंतर महानगरपालिका इमारतीच्या पायऱ्यांवर बसून भाजपच्या भ्रष्ट कारभाराविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी सोलापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे, माजी महापौर आरिफ शेख, माजी सभापती बाबा मिस्त्री, नगरसेवक नरसिंह आसादे, शिवसेना जिल्हाध्यक्ष प्रताप चव्हाण, मनसेचे जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर, शरणराज केंगनाळकर, राष्ट्रवादीचे चंद्रकांत पवार, कम्युनिस्ट पार्टी मार्क्सवादीचे दत्ता चव्हाण, आम आदमी पार्टीचे अध्यक्ष निलेश संगेपाग, गणेश डोंगरे, प्रमिला तुपलवंडे, तिरुपती परकीपंडला, भीमाशंकर टेकाळे, विष्णू कारमपुरी, अँड केशव इंगळे, बसवराज म्हेत्रे, जावेद खैरदि, पिरप्पा बंडगर, लखन गावडे, मल्लेशम कारमपुरी, हेमाताई चिंचोलकर, गणेश आप्पा नरोटे, मल्लिकार्जुन पिलगिरी, राजू कुचेकर, लक्ष्मण जाधव, सचिन पवार, सुशीलकुमार म्हेत्रे, संजय गायकवाड, सुमन जाधव, सुभाष वाघमारे, परशुराम सतारवाले, शिवशंकर अंजनाळकर, वारीस कुडले, जनार्दन बोराडे, सुरेश जगताप, विवेक कन्ना, बबलू पंडित, राम वाकसे, तुषार अवताडे, विवेक इंगळे, दत्ता खलाटे, प्रकाश नाईकनवरे, रवी डोके, संगप्पा कोरे, अरुण सामल, श्रुतिका बल्ला, शंकर परांडे, रवी म्हेत्रे, प्रशांत कावळे, चंद्रकांत मानवी, सिद्राम आनंद, भीमराव शिंदे, मोहसीन फुलारी, शिवाजी साळुंखे, ज्योती गायकवाड, चंदू नाईक, प्रतीक शिंगे, संस्कार नरोटे, आकाश वाघमारे, अजित पात्रे.



महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड एग्रीकल्चरचे कमिटी मेंबर आणि ठाणे जिल्हा होलसेल व्यापारी वेल्फेअर महासंघाचे अध्यक्ष श्री सुरेश भाई ठक्कर यांनी सांगितले की या भेटीदरम्यान महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष श्री. रविंद्र माणगावे, वरिष्ठ उपाध्यक्ष श्री. करणाकर शेट्टी, ट्रस्ट बोर्डचे चेअरमन श्री. आशिष पेडणेकर ,कोकण विभागाचे उपाध्यक्ष श्री. संतोष राणे, तसेच कोकण विभागातील गव्हर्निंग कौन्सिल सदस्य व सभासद उपस्थित होते. यावेळी 'गाव तिथे उद्योजक' या महाराष्ट्र चेंबरच्या महत्त्वाकांक्षी अभियानाची माहिती देण्यात आली. सिंधुदुर्ग जिल्ह्यात स्थानिक युवक व नागरिकांना उद्योजकतेकडे वळविण्यासाठी या अभियानाला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन मा. श्री. दीपक केसरकर यांनी दिले.

## एनएचएम भरतीत महाघोटाळा : निविदा बासनात गुंडाळून 'बोगस' भरती

### कर्मचाऱ्यांच्या वेतनातून 'कमिशन' वसुलीचा धक्कादायक प्रकार!

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

नियमानुसार कंत्राटी किंवा बाह्यस्रोत कर्मचाऱ्यांना सामाजिक सुरक्षिततेचा भाग म्हणून भविष्य निर्वाह निधी (EPF) आणि आरोग्य विमा (ESIC) सुविधा मिळणे अनिवार्य आहे. मात्र, या कर्मचाऱ्यांच्या खात्यातून कपात दाखवूनही प्रत्यक्षात: EPF आणि ESIC खात्यात दमडीही जमा केली जात नाही. प्रोफेशन टॅक्स (PT) भरण्यातही अनियमितता सुरू आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियान आणि १५ व्या वित्त आयोगांतर्गत आरोग्य यंत्रणेत मोठा आर्थिक गैरव्यवहार आणि मनमानी कारभार चव्हाट्यावर आला आहे. 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' आणि नागरी आरोग्य केंद्रांसाठी आवश्यक असलेल्या अटेंडंट व स्वीपर पदांच्या मनुष्यबळ पुरवठ्याची अधिकृत निविदा प्रक्रिया परस्पर गुंडाळून, नियमबाह्य पद्धतीने परस्पर पदे भरल्याचा तसेच या गरीब कर्मचाऱ्यांच्या वेतनातून थेट 'कमिशन' लाटले जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे आरोग्य वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संगनमतानेच हा महाघोटाळा सुरू असल्याचा संशय व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दि. ०५ ऑक्टोबर २०२४ ते दि. १५ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत १५ व्या वित्त आयोगांतर्गत 'आपला दवाखाना' व नागरी आरोग्य केंद्रांसाठी अटेंडंट आणि स्वीपर पुरवठ्याकरिता अधिकृत निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. मात्र, प्रशासनातील काही हितसंबंधी घटकांनी या निविदेवर कोणतीही पुढील कायदेशीर कार्यवाही केली नाही. इतकेच नव्हे, तर ही निविदा उघडण्याचे साधे सोपस्कारही पार पाडण्यात आले नाहीत. शासन निर्णयानुसार ही पदे अधिकृत बाह्यस्रोत एजन्सीच्या माध्यमातून पारदर्शक पद्धतीने भरणे बंधनकारक असताना, नियमांना हरताळ फासत ही पदे परस्पर शासन/प्रशासन स्तरावर भरून मोठा घोळ घालण्यात आला. खात्यात पगार जमा करायचा आणि कॅश परत घ्यायची: NHM च्या अधिकाऱ्यांचे 'कट कमिशन' या भरती प्रक्रियेतील सर्वात भयानक आणि गंभीर बाब म्हणजे काम करणाऱ्या तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे होणारे आर्थिक शोषण! एनएचएममधील संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून या अटेंडंट आणि स्वीपर यांच्या बँक खात्यावर कागदोपत्री वेतन जमा केले जाते. त्यानंतर कर्मचाऱ्यांना दमदाटी करून अथवा पदावरून काढण्याची भीती दाखवून, त्यांच्याकडून पगारातील मोठी रक्कम 'रोख' (Cash) स्वरूपात परत वसूल केली जात आहे. दिवस-रात्र स्वच्छता आणि सेवेचे काम करणाऱ्या या गरिबांच्या घामाच्या पैशांवर अधिकारी खुलेआम डल्ला मारत असल्याचे यावरून स्पष्ट होत आहे. EPF, ESIC आणि टॅक्सचाही पत्ता नाही; कर्मचाऱ्यांचे भवितव्य अंधारात या गंभीर गैरव्यवहारामुळे हक्काचे वेतनही न मिळणे आणि भविष्यातील लाभांपासून वंचित राहणे, अशा दुहेरी संकटात हे कर्मचारी सापडले असून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे.

अधिकृत निविदा न उघडता कोणाच्या आदेशाने ही पदे भरली गेली? कर्मचाऱ्यांकडून दरमहा रोख रक्कम उकळणारे एनएचएमचे ते अधिकारी कोण? आणि ईपीएफ/ईएसआयसीचे पैसे कोणाच्या घशात गेले? असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे.



## विद्यार्थ्यांच्या मागण्यांसाठी भेट

अकोले : (स. गांवकरी)

अकोले प्रतिनिधी महाराष्ट्र राज्याचे आदिवासी विकास मंत्री मा. अशोकजी उईके साहेब यांची आमदार डॉ. किरणजी लहामटे साहेब यांनी भेट घेऊन अकोले मतदारसंघातील विविध विकासकामांसंदर्भात चर्चा केली. आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थी विविध ठिकाणी आपल्या मागण्यांसाठी आंदोलनास बसले आहेत. त्यांच्याशी दूरध्वनीद्वारे चर्चा करून त्यांचे मागणीपत्र प्राप्त झाले होते. या मागण्यांसंदर्भात आज आदिवासी विकास मंत्री महोदयांची भेट घेऊन विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. विद्यार्थ्यांच्या मागण्या रास्त असून दि. ५ ऑगस्ट २०२६ रोजीचा शासन निर्णय (GR) रद्द करून त्याचा पुनर्विचार करण्यात यावा आणि विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय घेण्यात यावा, अशी आग्रही मागणी यावेळी केली. विद्यार्थ्यांच्या हिताचा सकारात्मक निर्णय लवकरच घेतला जाईल, असा विश्वास आहे.

## थोडक्यात बातम्या...



ठाणे (स. गांवकरी) : ठाणे : ठाणे महानगरपालिकेच्या दिवा प्रभाग समितीतील दिवा शहरातील मुंब्रादेवी कॉलनी येथील रस्ता व पदपथावर बस्थान मांडून अतिक्रमण केलेल्या फेरीवाल्यांवर पालिकेच्या अतिक्रमण विभागाने धडक कारवाई केली. प्रसंगी अनेक हातगाड्या उचलण्यात आल्या. (फोटो - संतोष पडवळ)

### ठाणे रेल्वे स्थानकात चेन स्नॅचिंग करणारी महिला अटकेत

ठाणे (स. गांवकरी) : ठाणे रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक २ वर लोकलमध्ये चढत असताना महिलेच्या गळ्यातील सोन्याची चैन हिसकावून पळण्याचा प्रयत्न करणाऱ्या २१ वर्षीय तरुण महिलेला ठाणे रेल्वे पोलिसांनी अटक केली. साध्या वेशातील महिला पोलीस कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे आरोपीला घटनास्थळीच पकडण्यात यश आले. अधिक माहितीनुसार, सविता तुषार शेडगे (वय ४०, रा. पलावा, डोंबिवली) या दि. १७ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ५.२५ वाजता ठाणे रेल्वे स्थानकाच्या फलाट क्रमांक २ वर आलेल्या अंबरनाथ स्लो लोकलच्या गार्ड बाजूकडील महिला जनरल डब्यात चढत होत्या. त्यावेळी त्यांच्या मागे उभ्या असलेल्या प्रियांका विशाल अहिरे (वय २१, रा. गोकुळधाम सोसायटी, शिवानी नगर, शहाड, ठाणे) हिने त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन हिसकावून चोरी केली. प्रसंगी फलाटावर कर्तव्य बजावत असलेल्या साध्या वेशातील महिला पोलीस अवंतिका सुर्वे व गीता राऊळ यांनी प्रसंगावधान राखत आरोपीला पकडले. या प्रकरणी ठाणे रेल्वे पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. 927/2026, कलम 304(2) BNS अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक आरोपीकडून चोरीस गेलेली अंदाजे ७७ हजार रुपये किमतीची ५.३८ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन हस्तगत करण्यात आली. तसेच आरोपीच्या अंगझडतीत एकूण २ लाख ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून सदरची कारवाई धर्मेंद्र आवारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ठाणे रेल्वे स्टेशन यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.



### पहिला सोमवार आणि नागपंचमीला भीमाशंकरात भाविकांचा जनसागर

मंचर (स. गांवकरी) : श्रावण महिन्यातील पहिला सोमवार आणि नागपंचमीचा दुग्धशर्करा योग साधत बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या निसर्गरम्य जंगलवासी श्री क्षेत्र भीमाशंकर येथे भाविकांचा जनसागर लोटला. महाराष्ट्रासह देशभरातून हजारो भाविकांनी भल्या पहाटेपासूनच भीमाशंकर येथे गर्दी केली होती. 'हर हर महादेव' आणि 'बम बम भोले'च्या जयघोषाने संपूर्ण भीमाशंकर परिसर तसेच सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्या दुमदुमून गेल्या होत्या. श्री क्षेत्र भीमाशंकर येथे मध्यरात्रीपासूनच भाविकांनी मंदिर परिसरात दर्शनासाठी रांगा लावण्यास सुरुवात केली होती. पहाटेची महापूजा भोसरीचे आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते पार पडली. त्यानंतर मंदिर भाविकांसाठी गाभारा दर्शनासाठी खुले करण्यात आले. श्रावणारंभ आणि नागपंचमीचा सण एकाच दिवशी आल्याने हजारो भाविक भीमाशंकरच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी दाखल झाले होते. हातात बेलपत्र, दूध, फुले, जल आणि पूजेचे साहित्य घेऊन भाविकांनी दर्शनासाठी तब्बल तीन ते चार किलोमीटरच्या रांगा लावल्या होत्या. अनेक भाविकांकडून सकाळपासूनच गाभाऱ्यात अभिषेक करण्यात येत होता.

### संत मुक्ताईची पालखी पंढरपूर वापसी



रावेर (स. गांवकरी) : गेल्या दोन महिण्या पासून , मुक्ताईनगर जिल्हा जळगाव येथिल संत मुक्ताईची पालखी व दिंडी सोहळा विठुरायाचे देर्शन घेऊन , आई आदिशक्ती मुक्ताईचे भक्तिमय वातावरणात, पालखीचे आगमन झाले, या भक्तिमय प्रसंगी आई मुक्ताईचे चरणी नतमस्तक होत आशीर्वाद घेतले . यावेळी विविध भागातून आलेल्या दिंड्या या आगमन सोहळ्यात सहभागी झाल्या होत्या . याप्रसंगी ह भ प श्री धनराज महाराज, महामंडलेश्वर श्री जनार्दन हरी जी महाराज, ह भ प श्री रविंद्र महाराज हरणे यांचेसह भाविकांनी आशीर्वाद घेतले.

## भारतीय बौद्ध महासभेचा वर्धापनदिन दिमाखात संपन्न!



भिवंडी : (स. गांवकरी)

भारतीय स्वातंत्र्याच्या ८०व्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया अर्थात भारतीय बौद्ध महासभा, ठाणे जिल्हा शाखेचा ३९ वा वर्धापनदिन तसेच ठाणे जिल्हा महिला शाखेचा ३रा वर्धापनदिन शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी बदलापूर-मांजर्ली येथील भव्य गौरी हॉलमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात आणि रेकॉर्डब्रेक उपस्थितीत दिमाखात संपन्न झाला. बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या बदलापूर नगरीत आयोजित या वर्धापनदिन सोहळ्यास भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर यांची प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या प्रारंभी ठाणे जिल्हा संरक्षण विभागाच्या वतीने आयु. हिरामण पगारे यांच्या नेतृत्वाखाली समता सैनिक दलाचे शिस्तबद्ध संचालन करण्यात आले. समता सैनिक दलाच्या जवानांनी डॉ. भीमराव आंबेडकर यांना दिलेली शिस्तबद्ध सलामी उपस्थितांचे विशेष आकर्षण ठरली. मार्गदर्शन करताना डॉ. भीमराव आंबेडकर यांनी अलीकडील विद्यार्थी आंदोलनाचा संदर्भ देत, आजच्या विद्यार्थ्यांसमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार हेच आदर्श असल्याचे सांगितले. एका हातात भारतीय संविधान आणि दुसऱ्या हातात बाबासाहेबांचे विचार व पोस्टर्स घेऊन विद्यार्थी आंदोलनात सहभागी होत असल्याचा उल्लेख त्यांनी केला.

## जुन्नरमध्ये पत्रकारांचा एल्गार : पत्रकारांच्या एकजुटीचा एल्गार

शिवनेरी : (स. गांवकरी)




### आ. शरद सोनवणे यांच्या धमकीच्या निषेधार्थ भव्य मोर्चा

ज्येष्ठ पत्रकार सुरेश वाणी यांना आमदार शरद सोनवणे यांनी जाहीर कार्यक्रमात धमकी दिली. या घटनेच्या निषेधार्थ जुन्नर, आंबेगाव, खेड आणि शिरूर तालुक्यांतील पत्रकार एकवटले आणि जुन्नर शहरातून भव्य मोर्चा काढण्यात आला. मोर्चामध्ये पत्रकारांनी जोरदार घोषणाबाजी करत आमदार शरद सोनवणे यांच्या धमकीच्या वक्तव्याचा आणि पत्रकारांवर दबाव आणण्याच्या प्रवृत्तीचा तीव्र निषेध केला. पंचलिंग चौक येथे धर्म रक्षक छत्रपती शिवाजी महाराज यांना नतमस्तक होऊन जुन्नर एसटी स्टँड, शहर, बाजारपेठ येथुन निघालेला हा मोर्चा थेट जुन्नर तहसील कार्यालयावर धडकला. याप्रसंगी विविध माध्यमांचे पत्रकार मोठ्या संख्येने या मोर्चामध्ये सहभागी झाले होते. पत्रकारांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीरपणे घ्यावा, पत्रकारांना धमकी देणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी आणि या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी, अशा प्रमुख मागण्या यावेळी करण्यात आल्या.

सर्व पत्रकारांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल्ल, जुन्नर तहसीलदार रणजित भोसले, जुन्नर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड तसेच प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया आदींकडे निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनामध्ये घटनेची निष्पक्ष चौकशी करून पत्रकार सुरेश वाणी यांची सुरक्षितता सुनिश्चित करण्याची आणि चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

यावेळी पत्रकाराला धमकी देणे म्हणजे लोकशाहीवरील हल्ला असल्याची भूमिका वक्त्यांनी मांडली. ज्येष्ठ पत्रकार डी. के. वळसे, इलेक्ट्रॉनिक मीडियाचे प्रदेशाध्यक्ष अतुल परदेशी, ज्येष्ठ पत्रकार सुरेश वाणी, महासंघाचे अध्यक्ष डॉ. समीर राजे, पत्रकार संदीप उत्तरडे, पत्रकार अशोक खरात, संपादिका स्नेहा बारवे आदी पत्रकार बांधवांनी भावना व्यक्त केल्या. पत्रकार आणि लोकप्रतिनिधींमध्ये मतभेद होऊ शकतात. मात्र पत्रकाराला धमकी, दबाव किंवा दहशतीच्या माध्यमातून गप्प करण्याचा प्रयत्न हा लोकशाहीसाठी गंभीर विषय असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक यांना या प्रकरणाच्या चौकशीसाठी संबंधित बैठकीतील व्हिडिओ, ऑडिओ रेकॉर्डिंग, मोबाइल रेकॉर्डिंग, सीसीटीव्ही फुटेज तसेच उपस्थित पत्रकार, नागरिक, पोलीस आणि सरकारी अधिकाऱ्यांचे जबाब तपासण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच पत्रकार सुरेश वाणी व सर्व पत्रकारांसाठी यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक पोलीस संरक्षण आणि सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

जुन्नर पोलीस स्टेशन आवारातून इलेक्ट्रॉनिक मीडियाचे प्रदेशाध्यक्ष अतुल परदेशी यांनी पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल्ल यांना थेट फोन दूरध्वनीवरून आमदार शरद सोनवणे यांच्यावर पत्रकाराला धमकी दिल्याच्या आरोपाप्रकरणी गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करण्याची विनंती केली. पत्रकार कोणत्याही राजकीय पक्षाच्या बाजूने किंवा विरोधात भूमिका घेण्यासाठी नसून जनतेच्या समस्या आणि प्रश्न मांडण्याचे काम करतात.

मोर्चाच्या शिष्टमंडळाने जुन्नरचे तहसीलदार रणजित भोसले तसेच पोलिसांकडे निवेदन दिले. या निवेदनात म्हटले आहे की ,लोकप्रतिनिधी आणि पत्रकार यांच्यात मतभेद असले तरी त्याचे रूपांतर धमकी किंवा दबावामध्ये होऊ नये, अशी भूमिका पत्रकारांनी मांडली.

# सोलापुरात भटक्या कुत्र्यानी मांडला उच्छाद : नागरिकांमध्ये दहशत

सोलापूर : (स. गांवकरी)



हाड हाड म्हटले तरी कुत्रा थेट अंगावरच आला'; आणि हाताला चावा घेतला आजूबाजूच्या नागरिकांनी पळत येऊन माझी कुत्रा पासून सुटका केली असे वृद्ध महिला सांगत होती तितक्यात एका लहान मुलाला कुत्राने चावा घेतला म्हणून त्याची आई धावत सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यासाठी घेऊन आली. सोलापुरात भटक्या कुत्र्यानी सद्या मोठ्या प्रमाणावर उच्छाद मांडला आहे. शहरात रोज 10 ते 15 नागरिक भटक्या कुत्र्याची शिकार होऊ लागले आहेत त्यामुळे नागरिकांचे जीवन या भटक्या कुत्रा मुळे अडचणीत आले आहे प्रत्येक गल्ली बोळामध्ये शंभर दीडशे भटकी कुत्री आहेत. आणि दिवसभर हे कुत्रे मोकाट फिरत असून येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना चावा घेऊन जखमी करत आहेत. सोलापुरातील महिला नागपंचमी मुळे हातावर काढत होती मेहंदी बसली होती, तर बसलेल्या महिलेला भटका कुत्रा येऊन चावा घेतला. तर एका चिमुकल्याच्याही मांडीला कुत्रा ने चावा घेतला असल्याची घटना सोलापुरात वेगवेगळ्या ठिकाणी घडल्या आहेत.; या घटनेनंतर एक माजी नगरसेवक म्हणाले,...तर सगळे कुत्रे महापालिकेत आणून सोडू. म्हणजे नागरिक भटक्या कुत्र्याना किती मोठ्या प्रमाणात वैतागले आहेत हे दिसून येते.

नागपंचमीपूर्वी वाडिया हॉस्पिटलमागील घरासमोर हातावर मेहंदी काढत बसलेल्या ५० वर्षीय सोजर काटे यांच्या उजव्या हाताचा भटक्या कुत्र्याने लचका तोडला. 'हाड हाड म्हणून ओरडले तरी कुत्रा अंगावर आला आणि त्याने चावा घेतला' अशी आपबिती त्या महिलेने सांगितली. तेथून गेलेला तो कुत्रा फॉरेस्टमधील एका व्यक्तीस आणि ताज हॉटेलजवळ खेळत असलेल्या चिमुकल्याच्या मांडीला देखील चावला. नागपंचमीपूर्वी वाडिया हॉस्पिटलमागील घरासमोर हातावर मेहंदी काढत बसलेल्या ५० वर्षीय सोजर काटे यांच्या उजव्या हाताचा भटक्या कुत्र्याने लचका तोडला. 'हाड हाड म्हणून ओरडले तरी कुत्रा अंगावर आला आणि त्याने चावा घेतला' अशी आपबिती त्या महिलेने सांगितली. तेथून गेलेला तो कुत्रा फॉरेस्टमधील एका व्यक्तीस आणि ताज हॉटेलजवळ खेळत असलेल्या चिमुकल्याच्या मांडीला देखील चावला. ही घटना सकाळी अकराच्या सुमारास घडली. जखमी तिघांवर 'सिव्हिल'मध्ये उपचार करण्यात आले.

सोमवारी (ता. १७) नागपंचमी असल्याने वाडिया हॉस्पिटलमागे राहणाऱ्या सोजर काटे मेहंदी काढत होत्या. त्यावेळी कुत्रा थेट त्यांच्या अंगावर धावला आणि उजव्या हाताला चावला घेतला. त्याला बाजूला सारत असताना कुत्रा गळ्यापर्यंत येत होता, असेही त्या महिलेने माध्यमांना सांगितले. तर अल्जान जहीर शेख या चिमुकल्यासह तो कुत्रा अब्दुल्ला वसीम शेख यांनाही चावला. जखमींना तातडीने सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्यांच्यावर उपचार करून त्यांना घरी सोडण्यात आले. सध्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये कुत्र्याने चावा घेतल्याने उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या वाढल्याचे तेथील कर्मचाऱ्यांनी सांगितले.

शहरातील रेल्वे लाइन परिसरातील ताज हॉटेल परिसर, केशव नगर झोपडपट्टी व फॉरेस्ट (वाडिया हॉस्पिटलजवळ) मोकाट कुत्र्याने तिघांना चावा घेतला. यासंदर्भात महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, आरोग्याधिकारी डॉ. राखी माने यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, पण त्यांनी नेहमीप्रमाणे प्रतिसाद दिला नाही. दरम्यान, माजी नगरसेवक तौफिक शेख म्हणाले, 'मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त महापालिकेने नाही केला तर आमचे कार्यकर्ते कुत्रे पकडतील आणि ते सगळे कुत्रे महापालिकेच्या आवारात सोडू. महापालिका सर्वांकडून टॅक्स घेते, मग सर्वांना सुविधा देणे, त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी महापालिकेवर आहे'.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरुषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २४६। किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे    POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




बुधवार दि. १९ ऑगस्ट २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## समृद्ध भविष्याच्या निर्मितीसाठी महाराष्ट्र गुंतवणूकदारांचे यशस्वी डेस्टिनेशन : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### इंडो- अमेरिकन चेंबर ऑफ कॉमर्स राष्ट्रीय परिषद २०२६

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

गुंतवणूक, तंत्रज्ञान आणि अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये भारत आणि जगाची जोडणी करण्यासाठी महाराष्ट्र हे प्रवेशद्वार आहे. भविष्यातील विविध क्षेत्रातील गरजा लक्षात घेता महाराष्ट्रामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता संशोधन आणि विकास, डेटा सेंटर, ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर यासोबत पायाभूत सुविधांची परिसंस्था निर्माण करण्यात येत आहे. त्यामुळे समृद्ध भारताच्या निर्मितीसाठी गुंतवणूकदारांचे महाराष्ट्र हे आवडते डेस्टिनेशन असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. राज्यातील विविध क्षेत्रातील संधीचा लाभ घेत अमेरिकेतील गुंतवणूकदारांनी आपल्या कल्पना, संशोधन घेऊन महाराष्ट्रात यावे. महाराष्ट्र शासन त्यांना येथील बाजारपेठ, पायाभूत सुविधा, कौशल्ययुक्त मनुष्यबळ उपलब्ध करुन देईल. त्यामुळे त्यांनी राज्यात गुंतवणूक करावी असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

इंडो-अमेरिकन चेंबर ऑफ कॉमर्सच्या हॉटेल ललित येथे आयोजित राष्ट्रीय परिषद २०२६ मध्ये मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर भारतातील अमेरिकेचे राजदूत जॉर्जिस गोर, उत्तर प्रदेशाचे राज्यमंत्री दिनेश प्रताप सिंह, इंडो अमेरिकन चेंबर ऑफ कॉमर्स राष्ट्रीय अध्यक्ष अनुप आचार्य, कार्यकारी उपाध्यक्ष प्रशांत कृष्णन, उपासना अरोरा, अवनीश अवस्थी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सध्या अमेरिका आणि भारतातील भागीदारी ही २१ व्या शतकातील अत्यंत महत्त्वपूर्ण भागीदारीपैकी एक आहे. या भागीदारीचा पुढील टप्पा हा धोरणात्मक आणि अर्थव्यवस्थेमध्ये सहभाग वाढविण्याचा आहे. या टप्प्यामध्ये महाराष्ट्र हा केंद्रस्थानी असणार आहे. हे दशक भारत आणि अमेरिकेच्या धोरणात्मक भागीदारीचे आहे.




इंडो-अमेरिकन चेंबर्स ऑफ कॉमर्सने या परिषदेसाठी 'भारत-अमेरिका सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारीची पुनर्रचना' हा अत्यंत महत्वाचा विषय घेतला आहे. ही परिषद भारत आणि अमेरिकेतील गुंतवणूक, संशोधन, निर्माण आणि विकास यामध्ये सहकार्य वाढविण्यासाठी महत्त्वाची ठरणार आहे. महाराष्ट्र ही ६६० बिलियन डॉलर अर्थव्यवस्था असून मागील सात वर्षांपासून १०.२ टक्के दराने विकास करीत आहे. राज्यात एकूण लोकसंख्येच्या ६५ टक्के लोकसंख्या ही २७ वर्ष वयापर्यंत आहे. जगाच्या दृष्टीने विचार केला, तर महाराष्ट्र ही जगातील पहिल्या २० देशांमधील अर्थव्यवस्था आहे. भारत हा जगामध्ये सर्वात तरुण देश आहे आणि या तरुण देशांमध्ये महाराष्ट्र हे तरुणाईचे आकर्षण आहे. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ही वैविध्यपूर्ण आहे.

## देशातील दोन कोटींपेक्षा जास्त विद्यार्थ्यांचे बायोमेट्रिक अपडेट पूर्ण

**नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)**

भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (यूआयडीएआय) तर्फे देशभरात युद्ध पातळीवर राबवण्यात येत असलेल्या अनिवार्य बायोमेट्रिक अद्यतन (एमबीयू) मोहिमेने महत्त्वपूर्ण टप्पा गाठला असून देशभरातील शालेय विद्यार्थ्यांपैकी २० दशलक्षांहून अधिक (२ कोटींहून अधिक) विद्यार्थ्यांची अनिवार्य बायोमेट्रिक अद्यतने पूर्ण करण्यात यश मिळाले आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या एमबीयू स्थितीबाबत दृश्यमानता देऊ करणाऱ्या शिक्षणासाठीच्या एकीकृत जिल्हा माहिती यंत्रणा प्लस (यूडीआयएसई+) सह यूआयडीएआयचे तांत्रिक एकत्रीकरण करून हा उपक्रम राबवण्यात येत आहे.




सप्टेंबर २०२५ मध्ये सुरु करण्यात आलेल्या विशेष अभियानाचा विस्तार आतापर्यंत १.५६ लाख शाळांपर्यंत झाला असून या अभियानाच्या मदतीने, समर्पित शाळा-स्तरीय शिबिरे तसेच यूआयडीएआय आणि राज्ये/केंद्रशासित प्रदेशांच्या शिक्षण विभागांतर्फे राबवण्यात येणारे समन्वित संपर्क कार्यक्रम यांच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांना त्यांचे आधार बायोमेट्रिक अद्ययावतीकरण करणे सोयीस्कररित्या शक्य झाले आहे. या उपक्रमामुळे एमबीयूसंबंधी सेवा विद्यार्थ्यांना थेट त्यांच्या शाळेत उपलब्ध होण्यात मदत झाली असून सदर प्रक्रिया कोट्यवधी विद्यार्थ्यांसाठी अधिक सुलभतेने आणि सोयीस्कर पद्धतीने उपलब्ध झाली आहे.

पाच वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांसाठीच्या आधार नोंदणीद्वारे लोकसंख्याविषयक माहिती आणि छायाचित्र जमा केले जाते तर या वयात बोटांचे ठसे आणि डोळ्यांचे बायोमेट्रिक्स अजूनही विकास पावत असल्यामुळे या मुलांच्या दोन्ही बायोमेट्रिक घटकांची नोंद केली जात नाही. लहान मुलांच्या आधारमध्ये अद्ययावत बायोमेट्रिक माहिती जमा केली जाईल याची सुनिश्चिती करून घेण्यासाठी एमबीयु सहाय्यक ठरते. बालकाच्या वयाची ५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर आणि पुन्हा त्याच्या वयाची १५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर अशा दोन टप्प्यांवर एमबीयु आवशयक असते. एमबीयुची योग्य वेळी पूर्तता झाल्यामुळे विद्यार्थ्याला शाळा आणि उच्च शिक्षणाचे टप्पे पार करत आधार प्रमाणीकरण अनिवार्य असलेल्या विविध सेवा आणि लाभ मिळवताना आवश्यक असलेली आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया सुरळीतपणे पार पडण्याची सुनिश्चिती होण्यात मदत होते.

## सीताराम सारडा विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

### तंत्रज्ञानाचा वापर शिक्षणासाठी करा, वेळ वाया घालवण्यासाठी नाही : पराग धूत



**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

हिंदसेवा मंडळ संचलित सीताराम सारडा विद्यालय व प्राथमिक शाळा, बागडपट्टी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे उद्योजक पराग धूत व ज्येष्ठ शिक्षिका सुलभा कुलकर्णी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

याप्रसंगी हिंदसेवा मंडळाचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी,सीताराम सारडा विद्यालयाचे चेअरमन अजित बोरा,प्राथमिक शाळेचे चेअरमन मधुसूदन सारडा, संजय मुदगल,मुख्याध्यापिका मंगला डोळस, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे,रविंद्र चोभे,दिपक आरडे, अमोल कदम,शिक्षक प्रतिनिधी विनोद जोशी, सौ. निमा राहींज,गोवर्धन पांडुळे आदींसह शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तंत्रज्ञानाचा योग्य वापर करा - पराग धूत

यावेळी बोलताना पराग धूत म्हणाले, सध्या जग वेगाने बदलत आहे. मोबाईल आणि इंटरनेट आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग झाले आहेत. मोबाईल आपल्याला माहिती देऊ शकतो, पण विचार आपल्याला स्वतः करावे लागतील. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर शिक्षणासाठी करावा, पण वेळ वाया घालवण्यासाठी करू नये. शिका, विचार करा आणि चांगले कर्म करा. उद्याचे भविष्य हे विद्यार्थ्यांच्याच हातात आहे. मोठी स्वप्ने पहा,मेहनत करा, कधीही हार मानू नका. शिक्षित,स्वच्छ आणि मजबूत भारत आपण सर्वांनी मिळून घडवूया.

स्वातंत्र्य सहजासहजी मिळालेले नाही - सुलभा कुलकर्णी

ज्येष्ठ शिक्षिका सुलभा कुलकर्णी म्हणाल्या, भारताला स्वातंत्र्य सहजासहजी मिळालेले नाही. अनेक हुतात्म्यांनी देशासाठी बलिदान दिले आहे. जबाबदार आणि चांगले नागरिक म्हणून राष्ट्रध्वजाचा मान-सन्मान राखणे हे आपले कर्तव्य आहे.

## जलसंधारण दिना' निमित्त आकाशवाणीवर'आमच शेत, आमचा परिसर मध्ये पांडुरंग गायसमुद्रे यांची विशेष मुलाखत

**कोपरगांव (समर्थ गांवकरी)**

शिर्डी, दि. १८: (उपमाका) माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जलसंधारण विषयक दूरदृष्टीला अभिवादन करण्यासाठी या वर्षा पासून त्यांच्या जयंतीदिनी, २१ ऑगस्ट हा 'जलसंधारण दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्ह्यातील जलसंधारणाच्या कामाची आणि उपक्रमांची माहिती देणारी जिल्हा जलसंधारण अधिकारी पांडुरंग गायसमुद्रे यांची विशेष मुलाखत आकाशवाणीच्या अहिल्यानगर केंद्रावरून 'आमचं शेत ,आपला परिसर' या कार्यक्रमात बुधवार दि.१९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७:३० वाजता प्रसारित करण्यात येणार आहे .

ही मुलाखत आकाशवाणी अहिल्यानगर केंद्र १००.१ मेगा हर्ट्झ एफ एम चॅनल आणि' तसेच 'छ्शुी जप खठ' मोबाईल पवर मुलाखतीचे प्रसारण करण्यात येणार आहे. वेव्हज या ओटीटी प्लॅटफॉर्म वरती आपल्याला कुठेही ऐकता येऊ शकते. ही मुलाखत माहिती अधिकारी डॉ. मीरा ढास यांनी घेतली आहे.



## जायगुडे आखाडा येथील अखंड हरिनाम सप्ताहाची काल्याच्या किर्तनाने सांगता

### काल्याचे शाश्वत सुख प्राप्त होण्यासाठी आपल्या इंद्रियांनाभगवंताच्या भक्तीकडे वळवा : स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज

**नेवासा (समर्थ गांवकरी)**

नेवासा तालुक्यातील जायगुडे आखाडा येथे राष्ट्रसंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने श्रावण मासानिमित्त हनुमान मंदिरामध्ये आयोजित त्रिदिनात्मक अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता श्री क्षेत्र देवगड संस्थानचे उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने दहीहंडी फोडून भक्तिमय वातावरणात करण्यात आली. काल्याचे शाश्वत सुख प्राप्त करून घ्यायचे असेल तर आपल्या इंद्रियांना भगवंताच्या भक्तीकडे वळवा असे आवाहन स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांनी यावेळी बोलताना केले.

अखंड हरिनाम सप्ताह सोहळयाच्या प्रसंगी स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या समवेत शोभायात्रा मिरवणूक काढण्यात आली.यावेळी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या वतीने लेझीम झांज पथकाद्वारे स्वागत करण्यात आले.वाड्या



वस्त्यांवरील महिला भाविकांच्या वतीने सडा मार्जन करून व रांगोळया घालून संतपूजनाद्वारे स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराजांचे स्वागत करण्यात आले.

## शहापूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र वासिंदच्या नूतन इमारतीचे

**ठाणे (समर्थ गांवकरी)**

राज्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम, सुलभ आणि नागरिककेंद्रित करण्याच्या उद्देशाने आयोजित आरोग्य संस्थांचे लोकार्पण व विविध समिती सदस्यांशी आरोग्य संवाद या राज्यस्तरीय कार्यक्रमाच्या अनुषंगाने ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, वासिंद यांच्या नूतन इमारतीचे लोकार्पण राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे उत्साहात संपन्न झाले.

या राज्यस्तरीय कार्यक्रमास मा. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री श्री. प्रकाश आबिटकर, सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव श्री. निपुण विनायक, सार्वजनिक आरोग्य आयुक्त श्री. संजय काटकर, आयुक्त शहरी आरोग्य डॉ. भोकरे तसेच संचालक डॉ. नितीन कंदेवाड हे दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

वासिंद येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नूतन इमारतीच्या लोकार्पण कार्यक्रमास शहापूरचे आमदार मा. श्री. दौलत दरोडा यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रातील विविध ग्रामपंचायतींचे पदाधिकारी, जन आरोग्य समितीचे सदस्य, अधिकारी-कर्मचारी, आशा स्वयंसेविका व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- **उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे लोकार्पण**
- **ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार व सुलभ आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या दिशेने महत्त्वाचे**



यावेळी सरपंच श्री. राजेंद्र मस्कर, उपसरपंच सौ. विशाखा शेलार, जन आरोग्य समितीच्या सदस्या श्रीमती शेटे,अंबरचे सरपंच सुरेखा जाधव , आवळे सरपंच श्री चिंतामण निखडा,अंबाजी ग्रामपंचायतीच्या आरोग्य समितीचे सदस्य तसेच अन्य लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

आरोग्य विभागाच्या वतीने जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दिनेश सुतार, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी श्री. संजय जाधव, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रमेश राठोड, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. रूपाली शेंडगे यांच्यासह प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व अधिकारी-कर्मचारी व आशा वर्कर्स उपस्थित होते.

नूतन इमारतीमुळे वासिंद परिसरातील आरोग्यसेवेला मिळणार अधिक बळ

लोकार्पणानंतर आपल्या मनोगतात मा. उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा त्यांच्या जवळच उपलब्ध करून देण्याच्या शासनाच्या कटिबद्धतेवर भर दिला. आधुनिक आणि सक्षम आरोग्य पायाभूत सुविधा उभारण्याबरोबरच प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना वेळेत व प्रभावी उपचार मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

वासिंद येथील नूतन प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत ही परिसरातील नागरिकांसाठी आरोग्यसेवेच्या दृष्टीने महत्त्वाची सुविधा ठरणार असून, या माध्यमातून मातृ व बाल आरोग्य, प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा, प्राथमिक उपचार, विविध आरोग्य तपासण्या आणि शासनाच्या आरोग्यविषयक योजनांचा लाभ अधिक प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यास मदत होणार आहे.

## गटेवाडीतील शेतकऱ्याचे पारनेर तहसीलसमोर आमरण उपोषण सुरू

### रस्ता अतिक्रमणमुक्त करून खुला करण्याची मागणी; प्रशासनाच्या कारवाईकडे लक्ष

**पारनेर (समर्थ गांवकरी)**

गटेवाडी येथील राळेगणसिद्धी रस्ता गावठाणाजवळ अतिक्रमणामुळे गेल्या दीड वर्षापासून बंद असल्याचा आरोप करत शेतकरी इंद्रभान दगडू सकट यांनी मंगळवार, दि. १८ ऑगस्टपासून पारनेर तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. रस्ता तातडीने अतिक्रमणमुक्त करून वाहतुकीसाठी खुला करावा, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे.

याबाबत सकट यांनी दि. १८ मे २०२६ रोजी तहसीलदार तसेच जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन रस्ता खुला करण्याची मागणी केली होती. मात्र, वारंवार निवेदने देऊनही अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याचे त्यांनी सांगितले. रस्ता बंद असल्याने परिसरातील १० ते १२ कुटुंबांची मोठी गैरसोय होत असून शेतकऱ्यांना शेतात जाण्या-येण्यासाठी अडचणी निर्माण झाल्या आहेत.

सकट यांनी दि. १० ऑगस्ट रोजी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात, पुढील आठ दिवसांत रस्ता खुला न झाल्यास दि. १८ ऑगस्टपासून तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला होता. त्यानुसार त्यांनी उपोषण सुरू केले आहे.




अतिक्रमण झालेल्या ठिकाणच्या दोन्ही बाजूंच्या शेती गटांची अधिकृत मोजणी करून सरकारी रस्त्याची हद्द निश्चित करावी आणि जेवढा रस्ता सरकारी आहे तेवढा पूर्णपणे अतिक्रमणमुक्त करून खुला करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

आपण हृदयविकाराचे रुग्ण असून उच्च रक्तदाबासाठी औषधोपचार सुरू असल्याचे सकट यांनी निवेदनात नमूद केले आहे. उपोषणादरम्यान आपल्या जीवितास काही बरे-वाईट झाल्यास शासन जबाबदार राहील, असा इशाराही त्यांनी प्रशासनाला दिला आहे. त्यामुळे प्रशासन या प्रकरणी काय भूमिका घेते, याकडे गटेवाडी ग्रामस्थ व शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार मिळावा : विश्वास पाटील

## जयंती उत्सवानिमित्त गुणगौरव सोहळा संपन्न



**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मोठे योगदान असणारे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची लढाई ही महाराष्ट्रासाठी आणि मराठी माणसासाठी होती. विविध भाषांमधून त्यांचे साहित्य जगापुढे आले आहे. मानवतावादी नेते असलेल्या साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी महानगरीय साहित्याचा पाया घातला असून त्यांना भारतरत्न द्यावा अशी आग्रही मागणी अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष पानिपतकार विश्वास पाटील यांनी केली आहे.

मालपाणी लॉन्स येथे सत्यशोधक साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे प्रबोधन मंच यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त गुणगौरव सोहळा कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर आमदार सत्यजित तांबे, काँग्रेसच्या अनुसूचित जाती जमाती विभागाचे प्रदेशाध्यक्ष डॉ.अनिरुद्ध वनकर, कारखान्याचे व्हा.चेअरमन पांडुरंग पाटील घुले, तालुका काँग्रेसच्या अध्यक्ष डॉ. जयश्रीताई थोरात, आयएएस उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी प्रेरणा खवळे, इंद्रजीत भाऊ थोरात,सुधाकर जोशी, रामहरी कातोरे, जगन्नाथ आव्हाड, विश्वनाथ आल्हाट अनुसूचित जाती जमाती विभागाचे कार्याध्यक्ष संतोष गायकवाड, जगन्नाथ आव्हाड, चंद्रकांत चव्हाण, दत्तात्रय अवचिते, गणेश बलसाने,दगडू साळवे, गोरक्ष जगधने, विजय खरात,किरण आल्हाट, सोनू गायकवाड, संकेत आल्हाट,स्वप्नील चव्हाण, अजित आल्हाट, आदित्य आल्हाट आदिमसह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

मातंग समाजामधून पहिली आईएएस झालेली विद्यार्थिनी प्रेरणा खवळे हिचा सन्मान करण्यात आला.

यावेळी प्राध्यापक रघुनाथ खरात यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. तर डॉ. साहेबराव गायकवाड, डॉ.भाऊसाहेब पवार, प्रा.तुकाराम सोळशे, प्राचार्य काळूराम बोरुडे, मिराबाई आव्हाड, प्राचार्य चंद्रकांत चव्हाण यांना समाजभूषण पुरस्काराने गौरवण्यात आले.

यावेळी बोलताना पानिपतकार विश्वास पाटील म्हणाले की, अण्णाभाऊ साठे यांचे जीवन हे अत्यंत कठीण परिस्थितीमध्ये गेले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील पहिल्या सात अग्रणींमध्ये त्यांचे नाव कायम आहे. समानता आणि मानवतावादाचे पुरस्कार दे असलेल्या अण्णाभाऊ साठे यांची फकीरा आणि माकडीचा चाळ या कादंबऱ्या साहित्यिकांसाठी अजिंठा आणि वेरूळ आहेत. त्यांच्या प्रत्येक साहित्यातून तत्कालीन परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येते.

विविध भाषांमधून त्यांचे साहित्य प्रकाशित झाले आहेत. भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व अण्णाभाऊ साठे हे साहित्य संमेलनाचे अध्यक्ष व्हायला पाहिजे होते ती खंत राहून गेली असे ते म्हणाले तर प्रत्येकासाठी अत्यंत प्रेरणादायी प्रवास असलेले लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना केंद्र सरकारने भारतरत्न द्यावा अशी आग्रही मागणी त्यांनी केली. तर अनुसूचित विभागाचे प्रदेशाध्यक्ष डॉ.अनिरुद्ध वनकर म्हणाले की, अण्णाभाऊंचा विचार हा मानवतेचा विचार आहे.अशा महापुरुषांना एका जातीमध्ये बांधून ठेवणे योग्य नाही. अण्णाभाऊंनी जाती व्यवस्थेला लाथ मारली. महापुरुषांच्या जयंती साजरा केल्या जातात डीजे नाच गाणे होतात परंतु पुढे काय हे लक्षात घेतले पाहिजे. मनुवादी व्यवस्था आपल्यासमोर उभी राहिली आहे मेलो तरी चालेल पण भाजपला मतदान करू नका असे सांगताना संगमनेरच्या विधानसभेचा निकाल हा संविधानाचा पराभव असल्याची खंत व्यक्त करताना भारतीयत्व हेच खरे राष्ट्रीयत्व असल्याचे ते म्हणाले.

तर आमदार सत्यजित तांबे म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर शहरांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले याचबरोबर अण्णाभाऊ साठे यांचे अद्यावत स्मारक उभारण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी या राष्ट्रपुरुषाकडून प्रेरणा घेताना सॅल्यूट करणारे होण्याऐवजी सॅल्यूट घेणारे व्हावे अशी जिद्द ठेवून अभ्यास करा असा सल्ला त्यांनी तरुणांना दिला.

# स्वातंत्र्यदिनी करंदीचा संकल्प; माझे गाव बालविवाहमुक्त गाव

## स्नेहालय संचलित उडान प्रकल्पाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

**पारनेर (समर्थ गांवकरी)**



स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून पारनेर तालुक्यातील करंदी गावाने सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत माझे गाव बालविवाहमुक्त गाव असा निर्धार केला. ग्रामसभेत ग्रामस्थांनी एकमताने हा संकल्प करत गावात यापुढे एकही बालविवाह होऊ देणार नाही, अशी सामूहिक प्रतिज्ञा घेतली. या निर्णयामुळे करंदी गावाने बालविवाहमुक्त गाव अभियानात आदर्श निर्माण केला आहे.

बालविवाहामुळे मुलींचे शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता आणि भवितव्य धोक्यात येते. ही सामाजिक समस्या दूर करण्यासाठी करंदी ग्रामपंचायत, ग्रामस्थ, महिला बचतगट, महिला मंडळ, किशोरवयीन मुले–मुली आणि युवकांनी एकत्रित येत या अभियानाला सुरुवात केली आहे.

या अभियानाचा प्रारंभ गावातून बालविवाह प्रतिबंधक जनजागृती पदयात्रेने करण्यात आला. पदयात्रेत गावातील मुले–मुली, महिला बचतगटातील महिला, ग्रामस्थ आणि विविध घटकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. बालविवाह थांबवा, मुलींचे शिक्षण वाचवा, माझे गाव बालविवाहमुक्त गाव अशा घोषणांनी संपूर्ण गाव दुमदुमून गेले.

या अभियानासाठी स्नेहालय संचलित उडान प्रकल्पाच्या टीमची विशेष उपस्थिती आणि मार्गदर्शन लाभले. उडान प्रकल्पाच्या माध्यमातून गावात सातत्याने बैठका, जनजागृती आणि पाठपुरावा करण्यात आला.

बालविवाहाचे दुष्परिणाम, बालविवाह प्रतिबंधक कायदा, बालकांचे हक्क, मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व तसेच बालविवाहाची माहिती मिळाल्यास तात्काळ प्रशासनाला कळविण्याबाबत ग्रामस्थांना मार्गदर्शन करण्यात आले.

उडान प्रकल्पाच्या सातत्यपूर्ण जनजागृती व पाठपुराव्यामुळे ग्रामस्थांमध्ये बालविवाहाविरोधात सकारात्मक वातावरण निर्माण झाले आणि त्यातूनच स्वातंत्र्यदिनाच्या ग्रामसभेत माझे गाव बालविवाहमुक्त गाव हा संकल्प करण्यात आला. गावात बालविवाहाची कुठलीही कुणकुण लागल्यास तात्काळ ग्राम पंचायत, प्रशासन किंवा संबंधित यंत्रणेला माहिती देण्याचा निर्धार यावेळी ग्रामस्थांनी व्यक्त केला. किशोरवयीन मुला–मुलींचे समुपदेशन, त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन आणि बालसंरक्षणासाठी गावपातळीवर सातत्याने उपक्रम राबविण्याचा निर्णयही घेण्यात आला. करंदी गावाने घेतलेला हा निर्णय केवळ एका गावाचा संकल्प नसून बालकांच्या सुरक्षित आणि उज्ज्वल भविष्यासाठी उचललेले सामाजिक पाऊल आहे. करंदीचा हा आदर्श पारनेर तालुक्यातील इतर गावांनाही प्रेरणा देईल आणि अधिकाधिक गावे माझे गाव बालविवाहमुक्त गाव या संकल्पाशी जोडली जातील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# श्रीनागेश्वर पालखी सोहळा जामखेडला उत्साहात संपन्न

**जामखेड (समर्थ गांवकरी)**

भक्तिमय वातावरणात वारकरी परंपरेनुसार टाळ मृदुंगाच्या जयघोषात जामखेडला सोमवारी श्रीनागेश्वर पालखी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. यावर्षी महिलांची संख्या लक्षणीय होती. शुध्द वारकरी परंपरेने हा पालखी सोहळा संपन्न झाला. जामखेडचे ग्रामदैवत श्रीनागेश्वरची नागपंचमीच्या निमित्ताने यात्रा असते.गेल्या २३ वर्षापासून यानिमित्ताने श्रीनागेश्वर पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. सोमवारी सकाळपासूनच येथे मोठ्या उत्साहाचे वातावरण होते. सकाळी शिवलीलामृत पारायण झाले. यजमान जामखेडच्या नगराध्यक्षा सौ. प्रांजलताई अमित चिंतामणी व श्री अमित शेठ चिंतामणी तसेच श्री. गोवर्धन जोरे व सौ. मंगलाताई जोरे यांच्या हस्ते भगवान श्रीनागेश्वराची विधीवत पुजा झाली.

दरम्यान पंचक्रोशीतील सर्व भजनी मंडळांनी मंदिरासमोर भजन सुरू केले. विठोबा रखुमाई भजन होताच यजमानांच्या हस्ते पालखीमध्ये मुखवटा स्थापन करण्यात आला. यावेळी

तुम्ही विश्वनाथ

दीन रंक मी अनाथ

हा महादेवाचा अभंग घेऊन पालखीचे प्रस्थान झाले. यावेळी एकच जयजयकार झाला ही पालखी रथामध्ये ठेवण्यात आली नंतर हरहर महादेव , ओम नमः शिवाय ओम नमः शिवाय नागेश्वराय शिव नागेश्वराय व ज्ञानोबा तुकाराम च्या जयघोषात व पंचक्रोशीतील भजनी मंडळांच्या टाळ मृदुंगांच्या गजरात पालखी मिरवणुकीस सुरुवात झाली.

श्रीनागेश्वर मंदिरापासून पालखी मिरवणूक सुरू झाली. श्रीनागेश्वर महाद्वारापासून खर्डा रस्ता, पुण्यश्लोक अहिल्यादेवी चौक, लक्ष्मी चौक, संविधान चौक, श्रीविठ्ठल मंदिर, छत्रपती शिवाजी महाराजपेठ, शनी मारुती मंदिर, जयहिंद चौक, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज मार्ग, जुने कोर्ट, महादेव गल्ली मार्गे वैतरणा नदी तीरातून नव्याने निर्माण करण्यात आलेल्या पालखी मार्गावरून हा सोहळा पुन्हा श्रीनागेश्वर मंदिर येथे पोहोचला. कीर्तन मंडपात दिंडी पोहोचल्यानंतर संत भार पंढरीत हा अभंग घेण्यात आला व आरती करण्यात आली. विठ्ठल भजनी मंडळ, श्रीनागेश्वर भजनी मंडळ, तपनेश्वर भजनी मंडळ, जमादारवाडी भजनी मंडळ, संत वामनभाऊ महाराज वारकरी शिक्षण संस्था, जगदाळे वस्ती भजनी मंडळ, बोराटे वस्ती भजनी मंडळ, बटेवाडी भजनी मंडळ व पंचक्रोशीतील भजनी मंडळे यावेळी सहभागी झाले होते.

दिंडी मार्गावर महिलांनी सडा रांगोळी केली होती.शहरात ठिकठिकाणी पालखी दर्शनासाठी भक्तांनी गर्दी केली होती.एकूणच संपूर्ण जामखेड शहर आज भक्तीमय झाले होते.

यावेळी, पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी,जेष्ठ नेते प्रा. मधुकर राळेभात, मनसे नेते प्रदीप टाफरे, जामखेड नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष पोपट राळेभात, शिवसेना युवा नेते आकाश बाफना,बांधकाम समितीचे सभापती तथा नगरसेवक मोहन पवार, नगरसेवक संजय काशिद,नगरसेवक राजेंद्र गोरे, प्रशांत राळेभात,पवन राळेभात, दिगंबर चव्हाण, मनोज कुलकर्णी, प्रविण चोरडिया,बजरंग डूचे, सचिन शिंदे, अमोल लोहकरे,शिवकुमार डोंगरे ड.महारूद्र नागरगोजे, राजेंद्र जाधव प्रा. ज्ञानदेव कुंभार, गणेश डोंगरे, संजीवन मेंढकर, भजनी मंडळाचे पंढरीनाथ महाराज राजगुरू, हरिदास गुंड, रावसाहेब कोल्हे, जगन्नाथ धर्माधिकारी, संतोष पाटील दादासाहेब महाराज सातपुते, आदी उपस्थित होते.

## अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या.,अ.नगर

मुख्य कार्यालय:- महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड,उपनिबंधक, ता.नगर कार्यालयाशेजारी, अ.नगर. ☎:०२४१-२३२६९१४

**जा. क्र. पतसंस्था फेडरेशन /९७९/ सन २०२६** **दिनांक -१३/०८/२०२६**

**स्थावर मालमत्ता जप्ती हुकूम**

ज्या अर्थी **विवेकानंद ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या,जामखेड.ता.जामखेड,जि.अ.नगर.** यांनी खाली नमुद केलेल्या थकबाकीदारांविरुध्द महाराष्ट्र सह.संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१/९८ ब अन्वये वसुली दाखले मिळविले असुन त्यांच्यावर रितसर मागणी नोटीस बजावली आहे.तरीही त्यांनी त्यांच्याकडील थकबाकीची रक्कम भरली नसल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७/(१०) नुसार मला मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था अ.नगर यांनी प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरुन मी **एम.ए.शेख** विशेष वसुली व विक्री अधिकारी खालील नमुद स्थावर मालमत्ता थकीत येणे रक्कम वसुलीकरिता जप्त करीत आहे. आणि महाराष्ट्र सहकारीसंस्था अधिनियम १९६० चे कलम ९९ मधील तरतुदीनुसार वसुली दाखला दिल्यानंतर सदर स्थावर मालमत्तेचे कोणतेही खाजगी हस्तांतरण / दुसऱ्याच्या स्वाधीन करण्यात आलेली असेल किंवा विक्री अथवा तिच्यावर कोणताही भार,गहाण,दान देण्यात किंवा बोजा निर्माण करण्यात आला असेल, तर त्या सर्व बाबी पतसंस्थेच्या बाबतीत रद्द / निरर्थक ठरतील.

| अ.नं. | थकबाकीदाराचे नाव | गांव | स्थावर मिळकत<br>वसुली दा.रक्कम | गट नं./प्लॉट नं./मिळकत नं. | क्षेत्र हे. आर | आकार रु. पै | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | पुर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
| १. | कर्ज - अर्जुन बाजीराव कातोरे यांची मिळकत व करिता | तेलांगशी<br>तेलांगशी<br>तेलांगशी | ३१२५३६/-<br>+इतरखर्च+<br>होणार<br>व्याज | १<br>७<br>८ | १.३३<br>१.०५<br>२.५० | १.७०<br>१.९३<br>४.४२ | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| | जामि -शशिकांत निवृत्ती अनपट यांची मिळकत | तेलांगशी<br>तेलांगशी<br>तेलांगशी<br>खर्डा | | २६६<br>२६७<br>२६९<br>२६६/१ | ०.६२<br>०.६६<br>०.८२<br>०.०२ | ०.८६<br>०.९१<br>१.४२<br>०.०३ | | | | |
| | जामि-हनुमंत बापुराव कातोरेयांची मिळकत | तेलांगशी<br>वाकी<br>खर्डा<br>ता.जामखेड | | १४७<br>१५०<br>७०३/१ | ३.२०<br>२.८१<br>०.०२.०६ | ३.३८<br>४.४८<br>०.०४ | | | | |
| २. | कर्ज - अमोल भगवान नाळे करीता | | ५४६०५/-<br>+इतरखर्च+<br>होणार<br>व्याज | | | | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| | जामि -दिपक मधुकर गोलेकर यांची मिळकत | खर्डा | | मा.क्र.८३५/२मालमत्ते वर्णन २७*१६.५ आर सी सी इमारत बांधकाम व ३५.५*१३.५ व ४८.४२ खुली जागा | ४१.३९ चौमी | - | | | | |
| | | खर्डा<br>ता.जामखेड | | ७०२पैकी | ०.००.६६ पैकी | ०.०१ | | | | |
| | जामि -किशोर लक्ष्मण शेवाळे | | | | | | | | | |
| ३. | कर्ज - परमेश्वर राजाराम सुरवसे करिता | | ६०७३२/-<br>+इतरखर्च+<br>होणार<br>व्याज | | | | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| | जामि - शहाजी नामदेव सुरवसे यांची मिळकत | खर्डा<br>ता.जामखेड | | ३६२ | ०.०३.५० | ०.०२ | | | | |
| | जामि - बाजीराव सोमनाथ सुरवसे | | | | | | | | | |
| ४. | कर्ज- विक्रांत चारुदत्त गवळी करिता | | १३६७३०/-<br>+इतरखर्च+<br>होणार<br>व्याज | | | | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| | जामि-राजन हिरालाल शहा यांची मिळकत | खर्डा | | मा.क्र.५५५/१मालमत्तेचे वर्णन४२*३०यात आर सी सी एकमजली इमारत बांधकाम | ११७.०६ चौमी | - | | | | |
| | | खर्डा | | १८७पैकी | ०.२० | ०.२८ | | | | |
| | जामि- महाविर फुलचंद गुजर यांची मिळकत | खर्डा<br>ता.जामखेड | | मा.क्र.३२८मालमत्ते वर्णन ३०.५*१२.५ यात विट सिमेंट पत्रे बांधकामव१८*१२.५ खुली जागा | ३५.४२चौमी | | | | | |
| ६. | कर्ज -दिगांबर बन्सी राजगुरु यांची मिळकत व करीता | दिघोळ | ७२०१०/-<br>+इतरखर्च+<br>होणार<br>व्याज | मिळकत नं.४९६ मिळकत वर्णन १०खणाची जागा | ३०० चौमी | ३० | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| | जामि - हनुमान भगवान तागड यांची मिळकत | दिघोळ | | ५०८पैकी | २.०२पैकी | ७.९१ | | | | |
| | संमती- लक्ष्मण दिगांबर राजगुरु यांची मिळकत | दिघोळ<br>ता.जामखेड | | मिळकतनं.५०१मिळकत वर्णन ३ खण व पत्रे १० खुली जागा | ४०० चौमी | १२० | | | | |
| ७. | कर्ज - परमेश्वर रामलिंग जिरेकर करिता | | १९०४८०/-<br>+इतरखर्च+<br>होणार<br>व्याज | | | | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| | जामि - गहिनीनाथ रामभाऊ विटकर यांची मिळकत | दिघोळ | | मिळकत नं.२१५मिळकतीचे वर्णन ४ खण १४ पत्रे २०*२० | ५४०चौमी | - | | | | |
| | जामि- सरस्वती रामलिंग जिरेकर यांची मिळकत | दिघोळ<br>ता.जामखेड | | मिळकत क्र.७३मिळकतीचे वर्णन १२ पत्रे | ३०० चौमी | ११० | | | | |
| | जामि- भगवान शंकर पाचनकर | | | | | | | | | |
| ८. | कर्ज - दादासाहेब बबन दराडे यांची मिळकत व करीता | पांढरेवाडी<br>पांढरेवाडी | ४७९५०/-<br>+इतरखर्च+<br>होणार<br>व्याज | १७९<br>१८० | ०.१८.००<br>०.०७.०० | ०.२०<br>०.०८ | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| | जामि - सुरेश उत्तम जायभाय यांची मिळकत | जायभायवाडी<br>जायभायवाडी<br>जायभायवाडी<br>जायभायवाडी<br>ता.जामखेड | | १२८<br>१२९<br>१३६<br>१५९ | ०.२९<br>०.२७<br>०.२०<br>०.०५ | -<br>०.९८<br>०.५७<br>०.०९ | | | | |
| | जामि- भगवान महादेव दराडे | | | | | | | | | |
| ९. | कर्ज -अशोक भगवान धावडे करिता | | १५३०३०/-<br>+इतरखर्च+<br>होणार<br>व्याज | | | | | | | |
| | जामि - बाळु मुरलीधर सोनार यांची मिळकत | वाकी<br>ता.जामखेड | | २९/१ | ३.२४ | ३.९४ | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| | जामि- लंकाबाई अशोक धावडे | | | | | | | | | |
| | जामि- अश्विनी अशोक धावडे | | | | | | | | | |
| | जामि-अजित अशोक धावडे | | | | | | | | | |
| | जामि-लक्ष्मण केरु श्रीराम [मयत] | | | | | | | | | |
| ११. | कर्ज -महंमद माणिक आतार [मयत] | खर्डा | ५१७९५/-<br>+इतरखर्च+<br>होणार<br>व्याज | | | | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| | जामि - जाकिर महमंद आतार यांची मिळकत | खर्डा | | २७७ पैकी<br>[पो.ख ०.००.५०] | ०.१७.००पैकी | ०.१४ | | | | |
| | जामि- जाफर हुसेन आतार यांची मिळकत | खर्डा | | २७७ | १.१९ | ०.९८ | | | | |
| | संमतीदार-हुसेन माणिक आतार यांची मिळकत | खर्डा | | मा.क्र.१५८७ मालमत्तेचे वर्णप २६.५*यात आर आर सी इमारत एक मजली पत्रे बांधकाम व २६.५*१०खुली जागा | ४९.२४चौमी | - | | | | |
| | | खर्डा<br>ता.जामखेड | | मा.क्र.१५८७ मालमत्तेचे वर्णन २६.५*२० यात आर सी सी इमारत एक मजली पत्रे बांधकाम व २६.५*१० खुली जागा | २४.६२ चौमी | - | | | | |
| | जामि- लतीका मजिद आतार | | | | | | | | | |
| | जामि-ईस्माईल जानमहंमद शेख | | | | | | | | | |

हा आदेश प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत वसुल पात्र रक्कम व त्यावरील येणे व्याज न भरल्यास वरीलप्रमाणे जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचा जाहिर लिलाव करण्यात येईल व पतसंस्थेस येणे असलेल्या वसुल पात्र रक्कमेचा भरणा केला जाईल. वरील स्थावर जाहिर लिलावाने विक्री करुन ही वसुल पात्र रक्कमेएवढी रक्कम न आल्यास जामिनदारांकडुन वरील प्रमाणेच प्राधान्याने वसुली केली जाईल,याची जामिनदाराने नोंद घ्यावी.

सही
(एम.ए.शेख)
विशेष वसुली व विक्री अधिकारी
अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सह.
फेडरेशन मर्या,अ.नगर

स्थळ :- अ.नगर
दिनांक -१३/०८/२०२६

सिल

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### आळंदी माऊली मंदिरात परंपरा जपत नागपंचमी साजरी

**नागदेवतेची सनईसह सवाद्य मिरवणूक**



आळंदी (समर्थ गांवकरी)

येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरात प्रथा परंपरांचे पालन करीत या वर्षी श्रावणातील नागपंचमी सण उत्साहात साजरा करण्यात आला. नेहमी प्रमाणे भाविकांच्या गर्दीने माऊली मंदिर परिसर गजबजून गेला होता. नागपंचमी दिनी श्रींचे दर्शनास महिला भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

नागपंचमी निमित्त आळंदीतील मानकरी कुटुंबातील महिलांनी परंपरागत पद्धतीने उत्साहात नागदेवतेची पूजा करून नागपंचमी सण साजरा केला. या प्रसंगी नागदेवताची आळंदी नगरपरिषद चौकात पूजा करण्यात आली. त्यानंतर सनई वाद्यवादनात श्री राम मंदिर, श्री विष्णू मंदिर या ठिकाणी जात श्री नागदेवता श्रींचे आगमन माऊली मंदिरात झाले. प्रथा परंपरांचे पालन करीत नागदेवतेची पूजा मानकरी पुष्पा चिताळकर पाटील, माजी नगरसेविका ड.ज्योती राहुल चिताळकर पाटील, अनिता चिताळकर पाटील, निर्मला चिताळकर पाटील, सुष्टी घुडरे पाटील, राजश्री दिनेश कुऱ्हाडे पाटील, रेखा योगीराज कुऱ्हाडे पाटील, लक्ष्मी कुऱ्हाडे पाटील, सुवर्णा योगेश आरू,यांचे हस्ते झाली. नागपंचमी आळंदी पंचक्रोशीत देखील महिला भाविकांनी परंपरेने उत्साहात साजरी केली. आळंदी पंचक्रोशीत नागनरसोबा विधीवत पूजा परंपरेने झाली. श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या वतीने नाग देवतेची सनई चौघड्यात मिरवणूक काढण्यात आली. आळंदी नगरपरिषद चौक येथील नागदेवतेची पूजा करण्यात आली. यावेळी नाग देवताची पुजा, पुरण पोळी महानैवेद्य वाढविण्यात आला. या प्रसंगी दर्शनास भाविकांनी गर्दी केली होती. मंदिरात फुगड्यांच्या खेळ रंगला. नागदेवतेची पूजा करण्यास भाविकांनी गर्दी केली. व्यवस्थापक माऊली वीर, तुकाराम माने, सुरक्षा रक्षक, सेवक, पुजारी यांनी भाविकांना कमी वेळेत दर्शन देण्याची सुलभ व्यवस्था केली.

### कन्या विद्यालयात भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात संपन्न

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

येथील श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयात ८०वा भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात आणि देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीम. वर्षा भोईटे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी श्री. कुंडलिकराव दरेकर, सौ. ज्योती खेडकर, श्री. दिलीप भुजबळ, श्री. पीटर रणसिंग, श्री. प्रकाश मोटे, श्री. धनंजय अधोरे, श्री. शिवाजीराव साळुंके, रवीशेठ दंडनाईक, श्री. बाळासाहेब शिंदे, श्री. सचिन झगडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्यार्थिनींनी संगीतमय व तालबद्ध कवायत सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. तसेच विद्यार्थिनींनी साकारलेली भारताच्या नकाशाची प्रतिकृती विशेष लक्षवेधक ठरली. विविध उपक्रमांमुळे विद्यालयाचा परिसर देशभक्तीच्या भावनेने भारावून गेला होता. कार्यक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये राष्ट्रप्रेम, एकता आणि देशसेवेची भावना जागृत झाली.

### डॉ.जयश्रीताई थोरात यांच्या पुढाकारातून मुलींच्या स्वसंरक्षणासाठी मुक्कामार अभियान : अभिनेत्री इशिता शर्मा



संगमनेर (समर्थ गांवकरी)

भारतीय परंपरेमध्ये महिलांना मोठा सन्मान आहे मात्र सध्या मुली व महिलांवरील वाढलेले अत्याचार हे अत्यंत दुर्दैवी आहेत. मुलींमध्ये आत्मनिर्भर होण्याबरोबर स्वसंरक्षणासाठी आत्मविश्वास निर्माण होण्याकरता कॅन्सर तज्ञ डॉक्टर जयश्रीताई थोरात यांच्या संकल्पनेतून तालुक्यामधील २७ विद्यालयांमधून मुक्कामार हे अभियान राबवले जाणार असल्याचे प्रसिद्ध हिंदी चित्रपट अभिनेत्री तथा मुक्कामार फाउंडेशनच्या संस्थापक इशिता शर्मा यांनी सांगितले आहे.

डि.के. मोरे जनता विद्यालय वडगाव पान येथे एकविरा फाउंडेशन व मुक्कामार फाउंडेशन यांच्यामध्ये मुलींना वर्षभर ट्रेनिंग देण्याबाबत सामंजस्य करार करण्यात आला.

# जनता दरबारात ९२० तक्रारींपैकी ७३६ तक्रारींचा निपटारा; अधिकारी वर्गाचा पाच तास कस



श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

नागरिकांच्या विविध समस्या थेट जाणून घेऊन त्यांचा तातडीने निपटारा करण्यासाठी खासदार डॉ. निलेश लंके यांनी पंचायत समिती सभागृहात आयोजित केलेल्या आढावा बैठकीसह जनता दरबारात तब्बल ९२० तक्रारी प्राप्त झाल्या. त्यापैकी ७३६ तक्रारींचा निपटारा करण्यात आला. जवळपास पाच तास चाललेल्या या जनता दरबारात नागरिकांच्या प्रश्नांना उत्तरे देताना अधिकारी वर्गाचा चांगलाच कस लागला.

मतदारसंघातील जनतेच्या अडचणी समजून घेण्यासाठी खासदार डॉ. निलेश लंके यांनी आढावा बैठक व जनता दरबाराचे आयोजन केले होते. बैठकीस जवळपास सर्वच शासकीय विभागांचे विभागप्रमुख उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ नेते बाबासाहेब भोस, घनश्याम शेलार, हरिदास शिर्के, अनिल ठवाळ, शेतकरी नेते राजेंद्र म्हस्के, भगवान गोरखे, सरपंच शिवप्रसाद उबाळे, प्रा. संजय लाकूडझोडे, निवास नाईक आदी उपस्थित होते.

जनता दरबाराला सकाळपासूनच नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. शेतकरी, महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच विविध गावांतील ग्रामस्थ आपापल्या समस्या घेऊन उपस्थित झाले होते. पीकविमा, कर्जमाफी, सिंचनाचे प्रश्न, विजेचा कमी दाब, गावांतर्गत रस्ते व पूल, स्ट्रीट लाईटचा अभाव, ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टर व औषधांचा तुटवडा, शाळांमधील शिक्षकांची कम तरता, घरकुल, संजय गांधी निराधार योजना तसेच वृद्धापकाळ पेन्शन न मिळणे आदी तक्रारी नागरिकांनी मांडल्या.

नागरिकांच्या तक्रारी ऐकल्यानंतर खासदार लंके यांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना तातडीने सूचना देत प्रलंबित प्रश्नांचा निपटारा करण्याचे निर्देश दिले. यावेळी बहुतांश तक्रारी जागेवरच निकाली काढण्यात आल्या.

**आढळगाव अपघात प्रकरण गाजले**

१० जुलै रोजी आढळगाव येथे झालेल्या अपघातात विष्णू बन गोसावी या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांच्या कथित हलगर्जीपणामुळे या तरुणाचा बळी गेल्याचा आरोप करण्यात आला. या प्रकरणाचे वास्तव दैनिक 'पुढारी'ने मांडले होते.

शेतकरी नेते राजेंद्र म्हस्के व माजी जिल्हा परिषद सदस्य अनिल ठवाळ यांनी हा मुद्दा जनता दरबारात उपस्थित केला. दोषी ठेकेदार तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी त्यांनी केली. ज्येष्ठ नेते घनश्याम शेलार यांनीही दोषींवर कारवाई झाली पाहिजे, अशी भूमिका मांडली.

यावेळी खासदार लंके यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे घटनेबाबत विचारणा केली. मात्र, अधिकाऱ्यांना समाधानकारक उत्तर देता आले नाही. त्यामुळे खासदार लंके यांनी नाराजी व्यक्त केली. दोषींवर कारवाई करण्याच्या मागणीचे पत्र वरिष्ठ अधिकाऱ्यांना देऊन या प्रकरणी पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# वाढत्या चोऱ्या रोखण्यासाठी कठोर पावले उचला

## आमदार आशुतोष काळेंच्या पोलीस प्रशासनाला सूचना

कोपरगांव (समर्थ गांवकरी)



कोपरगाव शहरासह ग्रामीण भागात वाढत असलेल्या चोरीच्या घटनांची गंभीर दखल घेत आमदार आशुतोष काळे यांनी शहर व ग्रामीण पोलीस निरीक्षकांची बैठक घेऊन चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी कठोर पावले उचलून प्रभावी उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. नागरिकांच्या सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड न करता गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्यासाठी पोलिसांनी अधिक सतर्कतेने काम करावे असे निर्देश त्यांनी दिले.

कोपरगाव शहर व ग्रामीण भागात चोरांचा उपद्रव वाढला असून घरफोड्या, चेन स्नॅचिंग, तसेच शेतकऱ्यांच्या विहिरीवरील विद्युत मोटारी आणि केबल चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने नागरिकांसह शेतकरी वर्गामध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. विशेषतः विद्युत मोटार व केबल चोरीमुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत असून शेतीच्या कामांवरही त्याचा परिणाम होत आहे. त्यामुळे चोरीच्या वाढत्या घटनांवर तातडीने आळा घाला.

चोरीच्या घटना रोखण्यासाठी शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठा, बसस्थानक परिसर, संवेदनशील ठिकाणे तसेच ग्रामीण भागात नियमित पोलीस गस्त वाढवावी. रात्रीच्या वेळी विशेष गस्त पथके तैनात करून संशयित व्यक्ती व वाहनांवर बारकाईने लक्ष ठेवावे. उपलब्ध सीसीटीव्ही यंत्रणेचा प्रभावी वापर करून चोरीच्या घटनांचा तपास जलदगतीने पूर्ण करावा आणि गुन्ह्यांतील आरोपींचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशा सूचना आमदार आशुतोष काळे यांनी दिल्या.

नागरिकांच्या तक्रारींची गांभीर्याने दखल घेवून त्यावर तत्काळ कार्यवाही करावी. नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होईल, अशा पद्धतीने पोलिसांनी काम करावे. कोपरगाव तालुक्यात यापूर्वी काही पोलीस निरीक्षकांनी प्रभावीपणे काम करून गुन्हेगारीवर वचक निर्माण केला होता. त्यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करून त्यातील प्रभावी उपाययोजना सध्याच्या परिस्थितीत राबवाव्यात.

# रामकरण सारडा विद्यार्थीगृहात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

## रामकरण सारडा विद्यार्थी गृहाच्या विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास करून आदर्श नागरिक व्हावे-सचिन कटारिया

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)



माझे शिक्षण हिंद सेवा मंडळाच्या शाळेत झाले आहे. माजी विद्यार्थी असल्याने स्वातंत्र्यदिनी माझ्या हस्ते ध्वजारोहण होत आहे.याचा मला आनंद होत आहे. विद्यार्थ्यांनी चांगले गुणवत्तापूर्वक शिक्षण घ्यावे.यासाठी हिंद सेवा मंडळाने रामकरण सारडा विद्यार्थी गृहाची भव्य वास्तू उभारली आहे. रामकरण सारडा विद्यार्थी गृहाचे विद्यार्थी चांगले शिक्षण घेऊन उच्च पदस्थ अधिकारी म्हणून नोकरी करत आहे.येथील विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास करून आदर्श नागरिक व्हावे.असे प्रतिपादन हिंदसेवा मंडळाचे उद्योजक सचिन कटारिया यांनी केले आहे.

# डॉ. समाधान मैराळे यांची राज्य पत्रकार संघाच्या खान्देश विभागीय अध्यक्षपदी निवड

## जळगाव, धुळे व नंदुरबारमधील पत्रकार संघटन बळकट करण्यावर भर

अमळनेर (समर्थ गांवकरी)



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या खान्देश विभागीय अध्यक्षपदी डॉ. समाधान एकनाथ मैराळे यांची निवड करण्यात आली आहे. संघटनेच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी ही नियुक्ती जाहीर केली.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष निलेश सोमाणी, प्रदेश संघटक संजय भोकरे, प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे आणि संघटन सरचिटणीस किशोर रायसाकडा यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. मैराळे यांच्यावर खान्देश विभागाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

खान्देश विभागात जळगाव, धुळे आणि नंदुरबार या तीन जिल्ह्यांचा समावेश होतो. या तिन्ही जिल्ह्यांतील पत्रकारांना संघटित करून त्यांच्या व्यावसायिक, सामाजिक आणि संघटनात्मक प्रश्नांना प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करून देणे हे आगामी काळातील प्रमुख उद्दिष्ट राहणार आहे.

पत्रकारितेच्या बदलत्या स्वरूपाच्या पार्श्वभूमीवर पारंपरिक पत्रकारितेसोबतच डिजिटल मीडिया, सोशल मीडिया, मोबाईल पत्रकारिता, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), माहितीची पडताळणी, फेक न्यूज आणि पत्रकारितेतील आधुनिक तंत्रज्ञान या विषयांवर प्रशिक्षण उपक्रम राबविण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. नवोदित पत्रकारांना मार्गदर्शन तसेच कार्यरत पत्रकारांसाठी विविध कार्यशाळा घेण्यावरही भर दिला जाणार आहे.

पत्रकारांच्या स्थानिक पातळीवरील अडचणी, शासकीय यंत्रणांशी समन्वय, पत्रकारांच्या व्यावसायिक कौशल्यविकासाच्या संधी आणि पत्रकारिता क्षेत्रातील बदल यावर विभागीय पातळीवर सातत्याने संवाद साधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. खान्देशातील पत्रकारांना एकत्रित करून पत्रकारितेची गुणवत्ता, विश्वासार्हता आणि व्यावसायिकता वाढविण्यासाठी काम करण्याचा प्रयत्न राहील. संघटनेच्या माध्यमातून पत्रकारांच्या प्रश्नांना योग्य व्यासपीठ मिळवून देण्यास प्राधान्य दिले जाईल, असे डॉ. समाधान मैराळे यांनी सांगितले.

डॉ. मैराळे यांच्या निवडीमुळे खान्देश विभागातील पत्रकार संघटनेच्या कार्याला अधिक व्यापक स्वरूप मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत असून, आगामी काळात विभागातील विविध जिल्हे व तालुक्यांमध्ये संघटनात्मक उपक्रम, पत्रकार संवाद आणि प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याच्या दृष्टीने नियोजन केले जाणार आहे.

# प्रवरा नदी संवर्धन कामाच्या प्रस्तावाला केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी दिला हिरवा कंदील

अकोले (समर्थ गांवकरी)



नगरपंचायत चे माजी नगरसेवक तथा सामाजिक कार्यकर्ते प्रमोद मंडलिक यांनी केलेल्या मागणीची दखल घेत, शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या विशेष प्रयत्नातून येथील प्रवरा नदी संवर्धन कामाच्या प्रस्तावाला केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी हिरवा कंदील दाखवला आहे.

अकोले नगरपंचायत चे माजी नगरसेवक तथा सामाजिक कार्यकर्ते प्रमोद मंडलिक यांनी केलेल्या सातत्यपूर्ण मागणीची दखल घेत, शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या विशेष प्रयत्नातून व पाठपुराव्यातून या महत्त्वपूर्ण प्रस्तावाला सकारात्मक विचार केला जाईल व आयएफसी या सल्लागार संस्थेला प्रस्ताव दाखल करायचा सांगितला असून त्याच्यावर लवकर निर्णय घेतला जाईल, असे केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी सांगितले. तर या निर्णयामुळे अकोले परिसरातील नद्यांचे पुनरुज्जीवन, प्रदूषण नियंत्रण आणि पाणी साठवणूक क्षमता वाढवण्याच्या कामांना मोठी गती मिळणार असल्याचे अकोले नगरपंचायत चे माजी नगरसेवक तथा सामाजिक कार्यकर्ते प्रमोद मंडलिक यांनी सांगितले.

स्थानिक मागणीला अकोले तालुक्यातील नदी प्रदूषणाचा प्रश्न आणि संवर्धनाची गरज लक्षात घेऊन माजी नगरसेवक प्रमोद मंडलिक यांनी नवीदिल्ली या मागणीचा सातत्याने पाठपुरावा केला होता. तर खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाकडे या कामाचे महत्त्व पटवून दिले. सर्व स्तरातून खासदार भाऊसाहेब वाकचौरे व माजी नगरसेवक प्रमोद मंडलिक अभिनंदन होत आहे.

# वैष्णवधाम येथे डिसेंट फाउंडेशनच्या सौजन्याने संगणक लॅबचे उद्घाटन

जुन्नर (समर्थ गांवकरी)

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान मिळावे,संगणक शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी आणि त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला नवी दिशा मिळावी,या उद्देशाने डिसेंट फाउंडेशन, पुणे यांच्या सौजन्याने गुरुवर्य ह.भ.प. कोंडाजीबाबा डेरे वारकरी शिक्षण संस्था,पर्ण कुटी, वैष्णवधाम,ता:- जुन्नर येथे संगणक लॅबची उभारणी करण्यात आली. या संगणक लॅबचा उद्घाटन समारंभ सोमवार, दि:-१७ ऑगस्ट २०२६ रोजी उत्साहात संपन्न झाला.या संगणक लॅबचे उद्घाटन जगद्गुरुकृपांकित ह.भ.प.डॉ. चेतनानंद महाराज पुणेकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले.त्याचप्रमाणे साई सोनू कॅम्पुटर चे दत्तात्रय म्हस्के यांच्या वतीने मुलांना तीन महिन्याचा टायपिंग चा कोर्स व शासनाचे चघउङ चे प्रमाणपत्र देखील देण्यात येणार आहे. तसेच सुयश कम्पुटर चे रंजन घोडेकर व हाय स्पीड काम्पुटर चे दिलीप भगत यांच्या वतीने देखील मुलांना संगणक क्षेत्रात जी काही मदत लागेल ती देण्याचे त्यांनी कबूल केले.यावेळी आंबा उत्पादक भरत जाधव यांनी दिलेल्या आंबा रोपांचे मान्यवरांच्या शुभहस्ते वृक्षा रोपण करण्यात आले.तसेच डिसेंट फाउंडेशचे सल्लागार कृषितज्ञ डॉ.संतोष सहाणे यांच्या माध्यमातून सर्व मुलांसाठी मल्टीव्हिट्यामिन टॅबलेट ,आयुर्वेदिक टूथपेस्ट व साबण वाटप करण्यात आले. तसेच पंचायत समिती सदस्य संजय वऱ्हाडी यांनी या वारकरी शिक्षण संस्थेसाठी किचनशेड देण्याचे कबूल केले.

यावेळी डिसेंट फाउंडेशन, पुणेचे संस्थापक जितेंद्र बिडवई,पंचायत समिती सदस्य संजय वऱ्हाडी,सचिव डॉ.एफ.बी.आतार, संचालक आदिनाथ चव्हाण, लेखापरीक्षक सागर ताजणे, हायस्पीड स्किल हबचे दिलीप भगत, साई सोन कॉम्प्युटरचे दत्तात्रय म्हस्के, सुयश कॉम्प्युटरचे रंजन घोडेकर,वैष्णवधामच्या सरपंच शिल्पा योगेश बुचके, डॉ.दयानंद गायकवाड , मुख्या ध्यपाक धनंजय राजूरकर , प्राध्यापक शरद मनसुख, शिक्षक प्रवीण ताजने,पांडुरंग तोडकर ,गणेश मेहेर ,अजिंक्य सहाणे, माजी सरपंच सुदाम डेरे ,सुरेश गायकवाड, भरत जाधव ,योगेश बुचके,शीतल पवार तसेच गुरुवर्य ह.भ.प. कोंडाजीबाबा डेरे पर्णकुटी सेवा मंडळ, सर्व संचालक, बाल वारकरी व ग्रामस्थ मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.ग्रामीण आणि विशेषतः वारकरी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना संगणका





चे मूलभूत ज्ञान,डिजिटल तंत्र ज्ञानाचा वापर,शैक्षणिक अभ्यासासाठी आवश्यक असलेली संगणकीय कौशल्ये तसेच बदलत्या काळानुसार आवश्यक डिजिटल साक्षरता मिळावी, यासाठी ही संगणक लॅब उपयुक्त ठरणार आहे.

यावेळी मार्गदर्शन करताना मान्यवरांनी आजच्याडिजिटल युगात संगणक शिक्षण ही काळाची गरज असून, ग्रामीण विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अशा उपक्रमांचे मोठे महत्त्व आहे, असे प्रतिपादन केले.डिसेंट फाउंडेशन, पुणेच्या वतीने शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आणि सामाजिक विकासाच्या विविध क्षेत्रात सातत्याने उपक्रम राबविले जात असून, ग्रामीण विद्यार्थ्यांना आधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दिशेने हा संगणक लॅबचा उपक्रम महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सूरज पवार यांनी केले,स्वागत व्यवस्थापक ह.भ.प. शंकर पवार यांनी केले,प्रास्ताविक डॉ.एफ.बी.आतार यांनी केले तर आभार संस्थेचे उपाध्यक्ष दगडू पवार यांनी मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## स्वातंत्र्यदिनी गुणवंत विद्यार्थिनीला सायकल भेट



**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

भारताच्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून मढेवडगाव येथील उंडेमळा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील गुणवंत विद्यार्थिनी अस्मिता प्रदीप उंडे हिचा प्रहार दिव्यांग अपंग संघटनेच्या वतीने सायकल भेट देऊन गौरव करण्यात आला. प्रज्ञा शोध परीक्षेत गुणवत्ता यादीत स्थान मिळवल्याबद्दल संघटनेचे तालुकाध्यक्ष राजेंद्र पोकळे यांनी अस्मितेला सायकल भेट दिली.

यावेळी सहकारमहर्षी नागवडे सहकारी साखर कारखान्याचे ज्येष्ठ संचालक सुभाषकाका शिंदे, लोकनियुक्त सरपंच प्रमोद शिंदे, माजी उपसरपंच अमोल गाढवे, गोरखराव मांडे, पोलीस अंमलदार योगेश उंडे, ग्रामपंचायत सदस्य योगेश शिंदे, बाबासाहेब फापाळे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मनोज सुपेकर, माजी अध्यक्ष नवनाथ उंडे, प्रहारचे सुरेश गलांडे, युवानेते संग्राम शिंदे, निळकंठ उंडे, महाराजा शिंदे महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. प्रदीप उंडे, संतोष इंगावले आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक रामदास ठाकर यांनी केले. स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, भाषणे तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. या कार्यक्रमातून सुमारे २५ हजार रुपयांचा वस्तूरूप लोकसहभाग मिळाला. भाजप महिला आघाडीच्या तालुकाध्यक्षा देवयानी शिंदे यांनी यावेळी महिलांना मार्गदर्शन केले.

## महाराजा महाविद्यालयातील ओम व भाग्यश्रीची राज्यस्तरीय थलेटिक्स स्पर्धेसाठी निवड

**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

प्रवरानगर (ता. राहता, जि. अहिल्यानगर) येथे झालेल्या जिल्हास्तरीय फेडरेशन थलेटिक्स स्पर्धेत महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. ओम तोरकड याने १८ वर्षांखालील गटातील गोळाफेक स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला, तर भाग्यश्री कदमबांडे हिने १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकाविला. या कामगिरीच्या जोरावर दोन्ही खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



ओम व भाग्यश्री यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले. दोन्ही खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी झालेली निवड ही महाविद्यालयासाठी अभिमानास्पद बाब असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन बबनराव पाचपुते, मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य बाबासाहेब भोस, माजी आमदार राहुल जगताप, विकास समिती सदस्य महावीर पाटवा, प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, वरिष्ठ उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ, डॉ. नितीन थोरात, कनिष्ठ उपप्राचार्य प्रा. श्रीकांत थोरात, पर्यवेक्षक रत्नाकर झिटे, विभागप्रमुख प्रा. उषा बोरुडे, प्रा. विजय मगर, प्रा. संदीप दरेकर यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी दोन्ही खेळाडूंचे अभिनंदन करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा



**(समर्थ गांवकरी)**

महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात भारतीय स्वातंत्र्यदिनाचा ८० वा वर्धापन दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे होते. त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर वंदे मातरम्, राष्ट्रगीत आणि देशभक्तिपर गीतांनी परिसर देशभक्तीच्या भावनेने भारावून गेला.

यावेळी प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे यांनी स्वातंत्र्यलढ्यात बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण केले. मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शिक्षण, शिस्त, प्रामाणिकपणा, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, मानवता, विज्ञाननिष्ठा आणि राष्ट्रप्रेम या मूल्यांना आपल्या जीवनात महत्त्व द्यावे. बलशाली आणि सक्षम भारत घडविण्यात युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

संविधानाने दिलेले अधिकार आणि कर्तव्ये समजून घेऊन प्रत्येकाने देशाच्या प्रगतीसाठी योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. भारत हा युवकांचा देश असून, विद्यार्थ्यांनी ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान आणि सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून देशसेवेत योगदान द्यावे, असेही त्यांनी सांगितले.

# पहिल्या श्रावणी सोमवारनिमित्त गोदातीरावर 'गंगा गोदावरी महाआरती' भक्तिमय वातावरणात संपन्न

## संजीवनी युवाप्रतिष्ठानच्या वतीने आयोजित गंगा गोदावरी महाआरतीला भाविकांची उच्चांकी उपस्थिती

**कोपरगाव (समर्थ गांवकरी)**

पहिल्या श्रावणी सोमवारनिमित्त कोपरगाव येथील गोदावरी तीर, लहान पूल येथे संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेली 'गंगा गोदावरी महाआरती' भक्तिमय आणि आध्यात्मिक वातावरणात उत्साहात संपन्न झाली. आमदार युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांच्या संकल्पनेतून दरवर्षी आयोजित होणाऱ्या या धार्मिक सोहळ्याला शिवभक्तांसह नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

संत जनार्दन स्वामी आश्रमाचे मठाधिपती परमपूज्य रमेशगिरीजी महाराज, आत्मा मालिक ध्यानपीठाचे परमपूज्य परमानंदगिरीजी महाराज, परमपूज्य राघवेश्वरनंदगिरीजी उंडे महाराज यांच्यासह विविध संत–महंतांच्या पावन उपस्थितीत पवित्र गोदामाईची विधिवत महाआरती करण्यात आली. यावेळी कोपरगावसह संपूर्ण परिसरातील नागरिकांच्या सुख–समृद्धी, उत्तम आरोग्य, समाधान आणि सर्वांगीण कल्याणासाठी प्रार्थना करण्यात आली.

संत–महंतांचे सान्निध्य, गोदामाईच्या आरतीचा भक्तिमय सोहळा, शिवभक्तांची श्रद्धा आणि असंख्य भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे संपूर्ण गोदातीर भक्ती, श्रद्धा आणि आध्यात्मिक ऊर्जेने भारावून गेला. श्रावण महिन्याच्या पवित्र प्रारंभाला गोदामाईच्या साक्षीने झालेल्या या महाआरतीने धार्मिक आणि सांस्कृतिक वातावरणाला विशेष उंची प्राप्त झाली.

या वेळी मा.आमदार स्नेहलताताई कोल्हे, संजीवनी स्वयंसहाय्यता महिला बचत गटाच्या अध्यक्षा रेणुकाताई कोल्हे, नगराध्यक्ष पराग संधान यांनी उपस्थित भाविकांचे स्वागत केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संजीवनी युवा प्रतिष्ठानचे युवासेवक आणि स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.



महाआरतीसाठी शिवभक्त नागरिक, माजी सैनिक संघटनेचे पदाधिकारी, आजी माजी नगरसेवक,पदाधिकारी,विविध पक्षांचे नेते कार्यकर्ते,युवासेवक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्रद्धा, सेवा आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश देणारा हा सोहळा उपस्थितांच्या मनात आध्यात्मिक आनंदाची अनुभूती देणारा ठरला.

# वांगदरीत प्लास्टिकमुक्ती व मैला व्यवस्थापन केंद्राचे उद्घाटन



**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

स्वच्छ भारत मिशन ग्रामीण विकास योजनेंतर्गत वांगदरी ग्रामपंचायतीच्या पुढाकारातून उभारण्यात आलेल्या प्लास्टिकमुक्ती आणि मैला व्यवस्थापन केंद्राचे उद्घाटन पारनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वसंतराव चेडे, नागवडे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्र शिवाजीराव नागवडे तसेच पंचायत समितीचे माजी सदस्य विठ्ठलराव नागवडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

देशात प्लास्टिक कचऱ्याची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून, त्यावर प्रभावी उपाययोजना करणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर भारत सरकार व राज्य सरकारच्या संयुक्त योजनेअंतर्गत प्लास्टिक कचरा व्यवस्थापन केंद्र सुरू करण्यासाठी वांगदरी ग्रामपंचायतीने पाठपुरावा केला. जिल्हा परिषद व पंचायत समिती, श्रीगोंदा यांच्या सहकार्याने ही योजना कार्यान्वित करण्यात आली. त्याचबरोबर मैला व्यवस्थापन योजनाही मंजूर करण्यात आली असून, त्याअनुषंगाने या दोन्ही उपक्रमांचे उद्घाटन करण्यात आले.

या केंद्रामुळे गावातील प्लास्टिक कचऱ्याचे संकलन, वर्गीकरण व योग्य व्यवस्थापन करण्यास मदत होणार असून, गाव स्वच्छ व पर्यावरणपूरक ठेवण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# संगमनेरमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठीचा मार्ग मोकळा; आमदार सत्यजीत तांबे यांच्या पाठपुराव्याला यश!

## एसटी महामंडळाकडून स्मारकासाठीची जागा नगरपालिकेकडे हस्तांतरित

**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

संगमनेर शहराच्या दृष्टीने आजचा दिवस ऐतिहासिक आणि आनंदाचा ठरला आहे. शहराच्या मध्यवर्ती बसस्थानक परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारण्याच्या अनेक वर्षांपासूनच्या प्रयत्नांना आता प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. आमदार सत्यजीत तांबे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे एसटी महामंडळ आणि संगमनेर नगरपालिका यांच्यात जागा हस्तांतरणाचा करार आज करण्यात आला असून, एसटी महामंडळाने स्मारकासाठी निश्चित केलेली जागा नगरपालिकेकडे हस्तांतरित केली आहे. यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे.

यावेळी नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे, राज्य परिवहन महामंडळ अहिल्यानगरचे श्री. राजेंद्र दामोधर जगताप, माजी नगराध्यक्ष दुर्गाताई तांबे, उपनगराध्यक्ष नूर मोहम्मद शेख आणि मुख्याधिकारी दयानंद गोरे यांच्यासह नगरसेवक विश्वासराव मुर्तडक, किशोर टोकसे, शैलेश कलंत्री, किशोर पवार आदी उपस्थित होते.

या स्मारकासाठी २०१८ साली तत्कालीन नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे यांच्या कार्यकाळात संगमनेर नगरपालिकेने ठराव केला होता. त्यानंतर बसस्थानक परिसरात जागा मिळावी यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू होता. मात्र, एसटी महामंडळाच्या धोरणात्मक अडचणींमुळे जागा हस्तांतरित करण्यास विलंब झाला. दरम्यान, २०२३ साली आमदार सत्यजीत तांबे यांनी तत्कालीन मुख्यमंत्री व परिवहन मंत्री आणि विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन संगमनेर बसस्थानक परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली.



त्यांच्या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देत ६ मीटर बाय ४ मीटर जागा स्मारकासाठी देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच स्मारकाच्या परिसरात गार्डन आदी सुविधा विकसित करण्यासही परवानगी देण्यात आली. आमदार सत्यजीत तांबे म्हणाले, २०१८ पासून या स्मारकासाठी पाठपुरावा सुरू आहे. अतिरिक्त जागेचा प्रस्ताव एसटी महामंडळाच्या विचाराधीन असल्याने त्यासाठी आणखी किती काळ थांबायचे, हा प्रश्न होता. त्यामुळे उपलब्ध झालेल्या जागेत स्मारकाचे काम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. नगरपालिकेने यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण केली असून पुतळ्याची निविदा प्रक्रियाही अंतिम टप्प्यात आहे. संगमनेरकरांच्या मतानुसार छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे आज एसटी महामंडळ आणि नगरपालिकेतील करारामुळे या ऐतिहासिक कामाला प्रत्यक्ष सुरुवात होत आहे. स्मारकाच्या कामासाठी आवश्यक असलेली उपलब्ध जागा आता नगरपालिकेकडे आल्याने चौथरा, पुतळा आणि इतर प्राथमिक कामे सुरू करता येणार आहेत.

# अकोले महाविद्यालयाच्या नालंदा स्पर्धा परीक्षा अभ्यास केंद्रास पुस्तके भेट

## कक्ष अधिकारी सोपान आरोटे यांचे विधायक पाऊल

**अकोले (समर्थ गांवकरी)**

येथील अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालयाच्या नालंदा स्पर्धा परीक्षा अभ्यास केंद्रातील विद्यार्थ्यांसाठी मंत्रालयातील सहकार विभागाचे कक्ष अधिकारी सोपान आरोटे यांनी त्यांच्या संग्रहातील, सुमारे दोनशेहून अधिक पुस्तके भेट दिली. ही पुस्तके विविध स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आहेत.



सोपान आरोटे हे सन २०२१ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे घेण्यात येणारी राज्यसेवा परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत. स्पर्धा परीक्षांची तयारी करत असताना त्यांनी त्यासाठी लागणारी विविध संदर्भ पुस्तके विकत घेतली होती. त्या पुस्तकांचा त्यांना उपयोग झाला व मोठे यश मिळाले. त्यांनी काही काळ महाविद्यालयातील नालंदा स्पर्धा परीक्षा अभ्यास केंद्रामध्ये अभ्यास केला होता. महाविद्यालयाप्रती, केंद्राप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार पुस्तके उपलब्ध व्हावीत यासाठी आरोटे यांनी हे विधायक पाऊल उचलले.

'२०११ मध्ये सुरू झालेले महाविद्यालयाचे नालंदा स्पर्धा परीक्षा अभ्यास केंद्र हा महाविद्यालयाचा मानबिंदू आहे. आत्तापर्यंत अनेक विद्यार्थी येथे अभ्यास करून विविध परीक्षा उत्तीर्ण झाले व आज विविध पदांवर यशस्वीरित्या कार्यरत आहेत. सध्या अभ्यास करत असणाऱ्या विद्यार्थ्यांना ही पुस्तके सहाय्यभूत ठरतील व चांगले यश ते मिळवतील', असा आशावाद महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. शिवाजी खेमनर यांनी यावेळी व्यक्त केला.

याप्रसंगी नालंदाचे समन्वयक प्रा. संदेश कासार, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सुनील मोहटे, प्राणीशास्त्र विभागप्रमुख प्रा. सुरेखा आरोटे, प्रा. किरण कानवडे, प्रा. किर्ती गुंजाळ आदी उपस्थित होते.

# गणपतीपुळे ते पणजी नवी बससेवा सुरू; कोकण आणि गोवा प्रवास झाला अधिक सुखकर

**रत्नागिरी (समर्थ गांवकरी)**

रत्नागिरी– पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असलेली गणपतीपुळे ते पणजी (गोवा) नवीन बससेवा दिनांक १५ ऑगस्ट २०२६ पासून अधिकृतपणे सुरू करण्यात आली आहे. गोवा राज्य परिवहन महामंडळातर्फे (कदंबा) ही बस चालवली जात असून, या थेट सेवेमुळे प्रवाशांची मोठी सोय झाली आहे.

रत्नागिरीमधून थेट पणजी येथे जाण्यासाठी यापूर्वी पुरेशी बससेवा उपलब्ध नसल्याने प्रवाशांना बस बदलत नाहक त्रास सहन करावा लागत होता. मात्र, आता ही नवीन बस सुरू झाल्यामुळे प्रवासी वर्गामध्ये आनंदाचे वातावरण आहे. विशेषतः गणपतीपुळे आणि गोवा ही दोन्ही प्रसिद्ध पर्यटन स्थळे या बससेवेमुळे जोडली गेल्यामुळे कोकणातील पर्यटनाला अधिक मोठी चालना मिळणार आहे.

कदंबा महामंडळाची ही बस गणपतीपुळे येथून सुटून खालील मार्गाने पणजीकडे जाईल:

गणपतीपुळे – रत्नागिरी – पावस – आडिवरे – धारतळे – राजापूर – कणकवली – कुडाळ – सावंतवाडी – म्हापसा – पणजी

वेळापत्रक

१. गणपतीपुळे ते पणजी:

गणपतीपुळे: सकाळी ०७:१५ वाजता

रत्नागिरी: सकाळी ०८:३० वाजता

पावस: सकाळी ०९:०० वाजता

आडिवरे: सकाळी ०९:४० वाजता

धारतळे: सकाळी ०९:५० वाजता

राजापूर: सकाळी १०:३० वाजता

२. पणजी ते गणपतीपुळे :

पणजी बसस्थानक: दुपारी ०१:३० वाजता

रत्नागिरी, राजापूर आणि कोकणातील सर्व प्रवासी वर्गाने या नवीन बससेवेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन गोवा राज्य परिवहन महामंडळाच्या (कदंबा) वतीने करण्यात आले आहे.

# आम्ही सिद्ध लेखिका संस्थेत रत्नागिरीच्या सदस्यांवर महत्त्वाची जबाबदारी

**रत्नागिरी (समर्थ गांवकरी)**

आम्ही सिद्ध लेखिका या संस्थेची पहिली पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध झाली. कार्यकारिणीमध्ये रत्नागिरीच्या दोघी सदस्यांवर महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

आम्ही सिद्ध लेखिका संस्थेची वार्षिक सभा तसेच संस्थेची पहिली पंचवार्षिक निवडणूक उत्साहपूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात बिनविरोध पार पडली. संस्थेच्या अध्यक्षपदी प्रा. पद्मा हुशिंग (ठाणे) यांची एकमताने पुनर्नियुक्ती करण्यात आली. ठाणे येथील ज्येष्ठांचे नंदनवन सभागृहात ही निवडणूक झाली. ॲड. उमा धापटे यांच्या मार्गदर्शनाखाली नयना सहस्रबुद्धे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच वासंती वर्तक यांच्या सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्रातील संस्थेचे सर्व आजीवन सदस्य, विश्वस्त, सल्लागार, माजी कार्यकारिणी पदाधिकारी, विभाग प्रमुख तसेच जिल्हा शाखा प्रमुख यावेळी उपस्थित होत्या. सचिव वृषाली राजे यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक प्रक्रिया पार पडली.

उर्वरित नवनिर्वाचित कार्यकारिणी अशी – उपाध्यक्ष शुभांगी गान (नागपूर), सचिव मानसी जोशी, कार्याध्यक्ष यामिनी पाठक (पुणे), खजिनदार प्रतिभा चांदुरकर, (ठाणे), सहखजिनदार अस्मिता चौधरी (ठाणे), सहसचिव प्रा. स्नेहल पाठक (मराठवाडा–बीड), सुनेत्रा जोशी (रत्नागिरी), कार्यकारिणी सदस्य – माधुरी नवरे (डोंबिवली), वैशाली जोशी (डोंबिवली), देविका देशमुख (अकोला), मनीषा पाटील (सांगली), माधुरी चौधरी (संभाजीनगर), कविता कठाणे (विदर्भ), ऋतुजा उमेश कुळकर्णी (रत्नागिरी), संध्या प्रमोद महाजन (जळगाव) आणि ज्योती राजन टिपणीस (ठाणे).

या निवडणुकीत आम्ही सिद्ध लेखिका संस्थेच्या कोकण विभाग प्रमुख सुनेत्रा जोशी यांची मध्यवर्ती संस्थेच्या सहसचिवपदी तसेच ऋतुजा उमेश कुळकर्णी यांची मध्यवर्ती संस्थेच्या कार्यकारिणी सदस्य तसेच प्रसिद्धी प्रमुखपदावर नियुक्ती करण्यात आली आहे. कोकण विभागातील साहित्यिक व लेखिका चळवळीला व्यापक व्यासपीठ मिळवून देण्याच्या दृष्टीने या दोन्ही नियुक्त्या महत्त्वपूर्ण आहेत.

संस्थेच्या पहिल्याच पंचवार्षिक निवडणुकीत संपूर्ण कार्यकारिणीची निवड बिनविरोध होणे हे संस्थेतील एकजूट, परस्पर विश्वास आणि साहित्यिक कार्याला दिलेले महत्त्व याचे द्योतक असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.



आम्ही सिद्ध लेखिका संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील महिला लेखिकांना सक्षम व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्या साहित्यिक कार्याला प्रोत्साहन देणे आणि विविध साहित्यिक उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा संकल्प नवनिर्वाचित कार्यकारिणीने व्यक्त केला.